# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### मुंबईत शहरात सर्वाधिक चिकुनगुनियाचे रुग्ण आढळल्याबाबत

**(१) १४० (२७-०४-२०२५). श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्री.कालिदास कोळंबकर (वडाळा), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत शहरात सर्वाधिक चिकुनगुनियाचे रुग्ण असून गेल्या वर्षभरात ७३५ रुग्णांची नोंद महानगरपालिका रुग्णालयात झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेच्या दुर्लक्षामुळे ही परिस्थिती निर्माण झाली असल्यामुळे दररोज सरासरी दोन रुग्णांच्या जीवावर बेतत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चिकुनगुनियाचा प्रार्दुभाव रोखण्याच्यादृष्टिने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०३-२०२६) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) चिकूनगुनिया नियंत्रणाकरिता महानगरपालिके मार्फत विविध उपाययोजना राबवण्यात येतात. आरोग्य कर्मचारी वेळोवेळी घरोघरी भेटी देतात, तसेच बांधकाम स्थळांचे सर्वेक्षण आणि तापाच्या रुग्णांच्या परिसरातील लोकांचे सर्वेक्षण केले जाते. रुग्णालये, दवाखाने, खाजगी प्रयोगशाळा व इतर आरोग्य सेवा केंद्रांकडून आलेल्या माहितीचे विश्लेषण व कार्यवाही केली जाते.

चिकूनगुनिया हा आजार एडिस डासांच्या चाव्यामुळे होतो. यामुळे डास नियंत्रण कार्यक्रमांतर्गत, नियमितपणे अळया प्रतिबंधक उपाययोजना केल्या जातात. डासांची उत्पत्ती स्थाने शोधून ती नष्ट करणे, पाणी साचण्याची जागा शोधून ती नष्ट करणे. तसेच चहाचे कप, टिन, थर्माकोलचे बॉक्स, नारळाच्या शेंड्या, टायर यांसारख्या अडगळीच्या वस्तू शोधून त्यांची योग्य विल्हेवाट लावली जाते. महानगरपालिकेतर्फे वेळोवेळी स्कंध विराजित व वाहन विराजित धूम्र फवारणी यंत्राद्वारे इमारती तसेच झोपडपट्ट्यांमध्ये नियमितपणे धूम्र फवारणी केली जाते.

चिकूनगुनियाची माहिती आणि डास प्रतिबंधक उपायांबद्दल, वस्ती पातळीवर गृहनिर्माण संस्था, कार्यालये आणि शाळांमध्ये जनजागृती केली जाते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला येथील (जि.अहिल्यानगर) गेवराई ते शहापूर या महामार्गास मंजुरी देऊन निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(२) ४४५२ (३०-०४-२०२५). डॉ.किरण लहामटे (अकोले) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला येथील (जि.अहिल्यानगर) दुर्गम भागातील घाटघर ते मेट गावापर्यंत देवीचा घाट रस्ता बांधकाम केल्यास गेवराई ते शहापूर हा महामार्ग तयार होऊन नागरिकांना सोईचा होण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री व सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना माहे मे, २०२३ मध्ये लेखी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत उपमुख्यमंत्री, वित्त व नियोजन यांनी सचिव यांना रस्त्यांच्या कामासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत निर्देश दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, घाटघर ते मेट असा सर्वसाधारणपणे १२ ते १५ किलोमीटर चोंडे घाटरस्ता बांधकामासाठी मंजुरी देण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी रस्त्याच्या कामास मंजुरी देण्याबाबत किती कालावधी लागणार आहे, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (०६-०८-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) अहमदनगर जिल्हयातील अकोले तालुक्यातील शहापूर घाटघर वाकी राजुर अकोले संगमनेर रस्ता किमी २२/८०० ते ३०/८०० करिता अहवाल तयार करणे, वनजमिन हस्तांतरण प्रस्ताव व भूसंपादन करणे याकरीता रु.२००.०० लक्ष किमतीस प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून रु.३०.०० लक्ष किमतीचे कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत.

गांडुळवाडी (मेट गावाची वाडी) या गावाकडून जोडणाऱ्या संरेखेबाबतचा अहवाल तयार करण्याचे, भूसंपादनाचे तसेच DPR व इतर मंजूरीबाबतची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. सदर रस्त्याचे काम निधी, निकष व प्राधान्यक्रम नुसार हाती घेण्याचे नियोजन राहील.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिधुंदुर्ग जिल्हयातील कुडाळ येथे प्रधानमंत्री पोषण आहार योजनेतंर्गत निकृष्ट दर्जाचे धान्य पुरविले जात असल्याबाबत**

**(३) ४५२६ (०५-०५-२०२५). श्री.निलेश राणे (कुडाळ) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिधुंदुर्ग जिल्हयातील कुडाळ येथील प्रधानमंत्री पोषण आहार योजनेतंर्गत निकृष्ट दर्जाचे धान्य पुरविले जात असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत धान्य पुरविणाऱ्या ठेकेदारांविरुध्द कारवाई होण्याच्या दृष्टिने शासनाने काणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१८-०७-२०२५) : (**१) प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या पुरवठेदार यांच्याकडून कुडाळ तालुक्यामध्ये पुरवठा करण्यात येणाऱ्या वाटाणा या कडधान्याच्या दर्जाबाबत महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती या संघटनेची तक्रार प्राप्त झाली होती. गटविकास अधिकारी, पंचायत समिती, कुडाळ यांनी संबंधित पुरवठेदार यांना करारनाम्यातील तरतूदीनुसार तक्रार असलेले वाटाणा कडधान्य बदलून देण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार संबंधित पुरवठेदाराने वाटाणा बदलून दिला आहे.

(२) व (३) संबंधित पुरवठेदाराच्या देयकातून रु.१ लक्ष इतकी रक्कम दंडात्मक स्वरुपात वसूल करण्यात आली आहे.

---

## तत्कालीन प्रभारी गट शिक्षणाधिकारी, बीड यांनी केलेल्या अनियमिततेबाबत

**(४) ४५४९ (२९-०४-२०२५). श्री.संदिप क्षीरसागर (बीड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंचायत समिती, बीडचे तत्कालीन प्रभारी गटशिक्षणाधिकारी श्री. जाधव यांनी सन २०१९- २०२० या कालावधीमध्ये त्यांच्या कार्यालयाला वरिष्ठ कार्यालयाकडून शालेय पोषण आहार संदर्भात अंदाजे ५० ते ५१ लाख रूपयाचे अनुदान दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बीड तालुक्यामध्ये जिल्हा परिषद व खासगी संस्थेच्या अनुदानित किमान ६०१ शाळा किंवा काही शाळा विना अनुदानित असून गटशिक्षणाधिकारी, बीड यांनी माहे जून, जुलै, २०१९ मध्ये किमान ८१ शाळांना तर १३४ शाळांना माहे ऑगस्ट, सप्टेंबर, ऑक्टोबर, २०१९ या वर्षात दुसऱ्या टप्प्यामध्ये अनुदान दिल्याचे निदर्शनास आले हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बीड गटशिक्षणाधिकारी, व संबंधित कर्मचारी यांनी शाळांची निवड कोणत्या निकषाद्वारे करण्यात आली तसेच या अनुदानाचा विनीयोग कशा प्रकारे केला गेला याबाबत संभ्रम निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, समग्र शिक्षा अभियान अंतर्गत देखील बहुतांश निधी हा शाळेवर खर्च झालेला नसून त्याबाबतच्या तक्रारी वरिष्ठ कार्यालयाकडे शिक्षण समितीच्या सदस्यांनी व लोकप्रतिनिधींनी लेखी निवेदनाद्वारे दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, अधिकारी व कर्मचारी यांच्याकडून सर्व संबधीत विषयांची देयके, लेखा परीक्षण अहवाल व तत्सम कागदपत्रे यांचा तपशीलनिहाय अहवाल छायांकित प्रतिसहित लेखी स्वरूपात घेऊन समग्र शिक्षा अभियान व इतर लेखाशिर्ष अंतर्गत आलेल्या निधीचा लेखाजोगा त्रयस्त यंत्रणेमार्फत घेण्यात यावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी पत्राद्वारे करुनही कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (०३-०६-२०२५) :** (१), (२) व (३)

शासन निर्णय दिनांक २९ मे, २०१७ अन्वये प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत दुष्काळग्रस्त व टंचाईदृश्य भागातील पात्र शाळांना आठवडयातून तीन दिवस अंडी/ दुध/ फळे/ पौष्टीक आहार देण्याचे निर्देश देण्यात आले होते. यासाठी प्रति आठवडा प्रति विद्यार्थी रु.१५/- अशी रक्कम निश्चित करण्यात आली होती.

त्यानुसार सन २०१९-२० या वर्षात बीड तालुक्यातील योजनेंतर्गत पात्र ६०१ शाळांपैकी २३२ शाळांनी

सदर उपक्रमाची अंमलबजावणी केली होती. त्यानुषंगाने शिक्षणाधिकारी (प्राथ.) जिल्हा परिषद, बीड या कार्यालयाकडून पंचायत समिती, बीड अंतर्गत पात्र विद्यार्थ्यांना सदरप्रमाणे लाभ देण्यासाठी रु.५०,६४,४८५/- इतके अनुदान उपलब्ध करुन देण्यात आले होते.

(४) होय, निवेदन प्राप्त झाले आहे. तथापि, सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात प्राप्त निधीपैकी ९४.२८ टक्के निधी खर्च करण्यात आला आहे.

(५), (६) व (७) सन २०१९-२० या कालावधीत शालेय पुरक पोषण आहार व समग्र शिक्षा अभियानांतर्गत वितरित अनुदानाची चौकशी करण्यासाठी त्रिसदस्यीय चौकशी समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीच्या अहवालानुसार आर्थिक अनियमितता झाली नसल्याचे दिसून येत आहे.

---

## चिपळूण तालुक्यातील श्रीक्षेत्र गांधारेश्वर व संगमेश्वर तालुक्यातील श्री टिकळेश्वर मंदिर परिसराच्या सुशोभीकरणाच्या प्रस्तावास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

**(५) ४६४२ (२५-०४-२०२५). श्री.शेखर निकम (चिपळूण) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यात चिपळूण तालुक्यात वाशिष्ठी नदीच्या काठावर वसलेले श्रीक्षेत्र गांधारेश्वर मंदिर परिसर आणि संगमेश्वर तालुक्यातील श्री टिकळेश्वर मंदिर परिसर या दोन प्रसिद्ध स्थळांच्या विकास आणि सुशोभीकरणासाठी शासनाकडे निधीची मागणी करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ठिकाणी मोठ्या प्रमाणात पर्यटक व भाविक दर्शनासाठी येत असून येथे अनेक सोयीसुविधांचा अभाव असल्याने पर्यटक व भाविकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याअनुषंगे चिपळूण तालुक्यातील श्रीक्षेत्र गांधारेश्वर मंदिर परिसराच्या सुशोभीकरणासाठी रु. २ कोटींचा आणि संगमेश्वर तालुक्यातील श्री टिकळेश्वर मंदिर परिसराच्या सुशोभीकरणासाठी रु. ३ कोटींचा प्रस्ताव संचालक, पर्यटन संचालनालयाकडे सादर करण्यात आला असून या प्रस्तावांना अद्याप प्रशासकीय मंजुरी मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या दोन्ही प्रसिध्द स्थळांचा विकास व मंदिर परिसर सुशोभिकरण व्हावे या करीता निधीची तरतुद करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंभूराज देसाई (०४-१२-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) प्रादेशिक पर्यटन विकास योजनेंतर्गत प्राप्त प्रस्ताव राज्य पर्यटन विकास समितीच्या मान्यतेसाठी ठेवण्यात येतात. त्यानुसार श्री क्षेत्र गांधारेश्वर मंदिर परिसर आणि संगमेश्वर तालुक्यातील श्री टिकळेश्वर मंदिर परिसर या दोन प्रसिद्ध स्थळांच्या विकास आणि सुशोभीकरणासाठी अनुक्रमे रु.२०१.५६ लक्ष व रु.२९६.४९ लक्ष असे एकूण रु.४९८.०५ लक्ष इतक्या रकमेचे प्राप्त प्रस्ताव राज्य पर्यटन विकास समितीच्या दिनांक २७/०३/२०२५ रोजीच्या बैठकीत ठेवण्यात आले होते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोयना जलविद्युत प्रकल्पाच्या अंतर्गत कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्याबाबत

**(६) ४६४६ (२५-०४-२०२५). श्री.शेखर निकम (चिपळूण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा

खुलासा करतील काय :-
(१) कोयना जलविद्युत प्रकल्पाच्या अंतर्गत प्रकल्पग्रस्तांसाठी प्रगत कुशल प्रशिक्षणार्थी (PAP) ही योजना तब्बल दोन हजार मेगा वॅट विजनिर्मिती क्षमता असणाऱ्या कोयना जलविद्युत प्रकल्पामध्ये २००९ ते २०१६ या कालावधीत सुरू करण्यात आलेली योजना सन २०१७ पासून बंद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनेच्या माध्यमातून कोयना प्रकल्पामध्ये जे उमेदवार प्रकल्पग्रस्त प्रशिक्षणार्थी म्हणून नोकरीत घेतले आहेत त्यांचा प्रशिक्षणाचा कालावधी १० ते १२ वर्षे होऊनही त्यांना सेवेत घेण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यामुळे त्यांची वयोमर्यादा ४५ उलटून गेल्याने ते आता सेवेत कायम होण्यापासून वंचित राहत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी ज्या कर्मचाऱ्यांची सेवा ५ वर्षाहून अधिक होत असेल अशा कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्यात यावे व ही बंद केलेली योजना पुन्हा सुरु करावी या मागणीचा कर्मचाऱ्यांनी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला असतांना, मात्र याबाबत शासनाकडून कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-१२-२०२५) :** (१) होय अंशतः खरे आहे.
कोयना प्रकल्पग्रस्तांची मुख्य कार्यालयीन मंजूरी अन्वये सामाजिक बांधिलकी म्हणून प्रशिक्षणार्थीची पहिली तुकडी सन-२०११ साली सुरु करण्यात आली होती. तथापि संबधित प्रकल्पग्रस्तांकडे आवश्यक कागदपत्रे नसल्याने सन-२०१७ पासून कोयना/ पोफळी जल विद्युत प्रकल्प येथे नवीन प्रगत कुशल प्रशिक्षणाची तुकडी सुरु करण्यात आलेले नाही.
(२) होय अंशतः खरे आहे.
कोयना प्रकल्पग्रस्तांची मुख्य कार्यालयीन मंजूरी अन्वये सामाजिक बांधिलकी म्हणून प्रशिक्षण सुरु आहे.
सामान्य प्रशासन विभागाचा, शासन निर्णय क्र. न्यायप्र-१००९/प्र.क्र.२०२/०९/१६-अ दिनांक २७.१०.२००९ नुसार गट-क व गट-ड पदाकरीता प्रकल्पग्रस्त उमेदवारांची नियुक्ती पात्रता तपासून व स्पर्धा परिक्षेद्वारे गुणवत्तेनुसार करण्याबाबतचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार महानिर्मिती कंपनी कडून कोयना येथील ८९ प्रकल्पग्रस्तांना स्पर्धा परीक्षेव्दारे तंत्रज्ञ-३ या पदावर सामावून घेतले आहे. तसेच सध्यस्थितीत कोयना जल विद्युत केंद्र, पोफळी येथे एकूण ५५ प्रकल्पग्रस्त प्रगत कुशल प्रशिक्षणार्थी म्हणून प्रशिक्षण घेत आहे.
(३) हे खरे आहे,
वय वर्षे ४५ ओलांडलेल्या प्रकल्पग्रस्त उमेदवारांना महानिर्मिती प्रशासकीय परिपत्रक क्र.३१५ दिनांक २३ ऑक्टोबर, २०१५ सह महानिर्मिती प्रशासकिय परिपत्रक क्र.४४० दिनांक ११ जुलै, २०१९ नुसार ज्या प्रगत कुशल प्रशिक्षणार्थी यांनी प्रशिक्षणा दरम्यान वयाची ४५ वर्षे पूर्ण केली आहेत, अशा प्रशिक्षणार्थींनी विनंती केल्यास त्यांना निर्वाह भत्ताधारक म्हणून वयाच्या ५८ वर्षापर्यंत रु.१५,०००/-इतका निर्वाहभत्ता देण्यात येतो तसेच त्यांना वयाच्या ५८ वर्षापर्यंत प्रतिवर्षी रु. ५००/- ची निर्वाह भत्त्यात वाढ देण्यात येते अथवा सदरील प्रकल्पग्रस्त महानिर्मिती प्रशासकिय परिपत्रक क्र.३१६ दिनांक २३ ऑक्टोबर, २०१५ नुसार नोकरीच्या बदल्यात एक रक्कमी रु.५,००,०००/- घेण्याबाबतचा पर्यायही निवडू शकतात.
(४) प्रकल्पग्रस्तांना नोकरी देण्याबाबतचा मुद्दा मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे प्रलंबित होता.

या प्रकरणात मा. उच्च न्यायालयाने याचिका क्र. ७४७२/२००७ प्रकरणी दिनांक ३१ मार्च, २००८ रोजी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने, सामान्य प्रशासन विभागाने, शासन निर्णय क्र. न्यायप्र-१००९/प्र.क्र.२०२/०९/१६-अ दिनांक २७ ऑक्टोबर, २००९ रोजी निर्गमित केला आहे. सदर शासन निर्णयानुसार गट-क व गट-ड पदाकरीता प्रकल्पग्रस्त उमेदवारांची नियुक्ती पात्रता तपासून व स्पर्धा परिक्षेद्वारे गुणवत्तेनुसार करण्याबाबतचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे सरळसेवेने पद भरण्यात येते व त्यामध्ये प्रकल्पग्रस्तांसाठी आरक्षण ठेवण्यात येते.
(५) लागू नाही.

---

## राज्यातील प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांना पुरक पोषण आहार वितरणातील त्रुटी, साठा व्यवस्थापन व उपाययोजनांबाबत

**(७) ४६८३ (०५-०५-२०२५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना पुरक पोषण आहार शासनाने नेमून दिलेल्या प्रक्रियेप्रमाणे मिळत नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ रोजी मध्ये निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधित विभागातील अधिकारी व कर्मचा-यांच्या दुर्लक्षामुळे पुरवठा करणाऱ्या ठेकेदाराकडून चांगल्या प्रतीचे धान्य विद्यार्थ्यांना पोषण आहारात वेळेत मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जेवढे विद्यार्थी तेवढाच विद्यार्थ्यांचा पोषण आहार व जे विद्यार्थी त्या दिवशी शाळेत गैरहजर असतील त्या दिवशी धान्य साठा शिल्लक अशी शासनाची पद्धत असताना देखील बहुतांशी शाळेत सदर पद्धतीचा अवलंब करीत नसल्यामुळे पोषण आहाराचा शिल्लक धान्य साठ्याचा प्रश्न निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यातील प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना पुरक व चांगल्या प्रतीचा पोषण आहार वेळेत मिळावे तसेच शिल्लक धान्य साठ्याचा प्रश्न सोडविण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (२८-०५-२०२५) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.
(४) प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना चांगल्या प्रतिचा पोषण आहार वेळेत मिळावा यासाठी शिक्षण विभागातील क्षेत्रिय यंत्रणेमार्फत शाळांना वेळोवेळी भेटी देवून आहाराची गुणवत्ता व दर्जा याबाबत तपासणी केली जाते. तसेच, सर्व जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील दोन शाळा व केंद्रिय स्वयंपाकगृह स्तरावरील शिजविलेल्या आहाराची यादृच्छिक पध्दतीने NABL प्रमाणित प्रयोगशाळेमार्फत तपासणी करण्यात येते. विद्यार्थ्यांच्या दैनंदिन उपस्थितीनुसार पोषण आहाराचा लाभ दिला जातो. तसेच, महिनाअखेर विद्यार्थ्यांच्या अनुपस्थितीमुळे शाळा स्तरावर शिल्लक राहिलेला तांदुळ व धान्यादी माल वजा करुनच पुढील दोन महिन्यांची मागणी नोंदविली जाते.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## दौंड (जि. पुणे) तालुक्यातील चिबड, खारवट व पाणथळ शेतजमिनीचे सर्वेक्षण पूर्ण करून निधीसह मान्यता मिळण्याबाबत

**(८) ४७१४ (०१-०५-२०२५). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दौंड (जि. पुणे) तालुक्यात सततच्या जलसिंचनामुळे चिबड, पाणथळ व क्षारयुक्त जमिनींचे मोठ्या प्रमाणात वाढले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चिबड, खारवट व पाणथळ शेतजमिनीचे सर्वेक्षण पूर्ण करून प्रस्ताव सादर करण्याबाबत व त्यास निधीसह मान्यता मिळण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधी यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक १९ ऑगस्ट, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या बैठकीत राज्यातील चिबड, खारवट व पाणथळ शेतजमिनी निर्मूलनासाठी सुधारित धोरण निश्चित करून दौंड तालुक्यातील कामांना मान्यता देण्याबाबत सकारात्मक निर्णय घेण्यात आला होता, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलाबांची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२२-०१-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

नवा मुठा कालव्याच्या लाभक्षेत्रात दौंड तालुक्यात सन २०२२-२३ च्या अहवालानुसार एकूण ३३००.४५ हे. क्षेत्र पाणथळ व क्षारपड आढळून आले आहे.

(२) होय,

(३) व (४) दिनांक १९ ऑगस्ट, २०२४ रोजी सह्याद्री अतिथी गृह, मुंबई येथे मा. उपमुख्यमंत्री (गृह) यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली होती. सदर बैठकीमध्ये दौंड तालुक्यातील कामांना मान्यता देण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली.त्यात राज्यातील चर योजनेचे मापदंड निश्चित झाल्यानंतर या कामांचा विचार करण्यात यावा असे ठरले.

राज्यातील चर योजनेचे मापदंड व कार्यपध्दती निश्चित करण्यासाठी अप्पर मुख्य सचिव (जलसंपदा) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली होती. सदर अभ्यासगट समितीने त्याचा अहवाल शासनास दिनांक ३०.०८.२०२४ रोजी सादर केला आहे. त्यानुसार मापदंड निश्चित करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मालेगांव ( जि.नाशिक ) तालुक्यातील हसनपुरा,नवरंग कॉलनी आदी भागात पुरेसा पाणीपुरवठा करण्याबाबत

**(९) ४७४२ (०१-०५-२०२५). श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालीक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (जि.नाशिक ) तालुक्यातील हसनपुरा, नवरंग कॉलनी आदी भागात वेळेत पुरेसे पाणी पुरविण्यात यावे याकरिता या भागातील महिलांनी लोकप्रतिनिधिंच्या समवेत महानगरपालिकेच्या बाहेर धरणे आंदोलन केल्याचे माहे फेब्रुवारी,२०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खेर आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीसंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, मालेगांव तालुक्यातील गावांना पाणी पुरवठा नियमित होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (३०-०९-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हसनपुरा व नवरंग कॉलनीतील महिलांनी सायंकाळी ६ वाजता येणारे पाणी दुपारी २ वाजता सोडण्याची मागणी केली होती. सद्यस्थितीत हसनपुरा, नवरंग कॉलनी तांत्रिक कारणास्तव वेळेत बदल करता येणार नाही याबाबत हसनपुरा, नवरंग कॉलनी येथील महिला व लोकप्रतिनिधींच्या सदरबाब निदर्शनास आणुन दिलेली आहेत. तसेच आजरोजी हसनपुरा, नवरंग कॉलनी भागात नियोजित वेळेत पुरेसे पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

(३) मालेगाव तालुक्यातील गावांना समिती व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे मार्फत पाणी पुरवठा करण्यात येत आहे

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सांगली जिल्हयात स्टेडिअम नसल्यामुळे खेळाडूंची गैरसोय होत असल्याबाबत

**(१०) ४७५५ (२९-०४-२०२५). श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयात कबड्डी, कुस्ती, खो-खो यासह सर्वच क्रिडास्पर्धा मॅटवर इनडोअर होत असुन सांगली, मिरज या शहरात सध्या इनडोअर स्पर्धा व सरावासाठी एकही स्टेडिअम नसल्याने तसेच उपलब्ध क्रिडांगणाचीही दुरवस्था झाल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्टेडिअम नसल्यामुळे खेळाडूंची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन त्यानुंषगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार (१८-०९-२०२५) :** (१), (२) व (३) जिल्हा क्रीडा संकुल सांगली या क्रीडा संकुलामध्ये क्रीडा सुविधा निर्माण करण्याची कार्यावही सुरू आहे. तसेच मिरज तालुका क्रीडा संकुलामधील कोविड-१९ च्या कालावधीत उभारलेली वैद्यकीय संरचना हटवून क्रीडा उपक्रम पुन्हा सुरू करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात परिवहन विभागाने रिक्षा परवाना देण्याचा निर्णय घेतल्याने वाहतूक कोंडी होत असल्याबाबत

**(११) ४८१७ (०८-०४-२०२५). श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात परिवहन विभागाने मागेल त्याला रिक्षा परवाना देण्याचा निर्णय घेतल्याने राज्यात प्रमुख शहरांमध्ये रिक्षाची संख्या प्रचंड वाढल्याने वाहतूक कोंडी होत असून सदर रिक्षा उभ्या करण्यासाठी रिक्षा स्टॅन्ड उपलब्ध होत नसल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात एकूण किती रिक्षा परवाने इरादा पत्र देण्यात आलेली आहेत तसेच या रिक्षांना उभ्या करण्याकरिता किती रिक्षा स्टॅड व वाहनतळाची उभारणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाचे चौकशी केली आहे काय, चौकशी करुन राज्यातील प्रमुख शहरांमध्ये वाहनतळ व रिक्षा स्टॅन्ड उभारण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक (२८-११-२०२५) :** (१) हे खरे नाही.
(२) महाराष्ट्र शासनाने दिनांक २६.११.१९९७ रोजीच्या अधिसूचनेद्वारे आणि राज्य परिवहन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य यांच्या दिनांक ०९.०६.१९९८ रोजीच्या बैठकीतील ठराव क्रमांक ७/९८ अन्वये महाराष्ट्र राज्यात नव्याने ऑटोरिक्षा परवाने जारी करण्याबाबत निर्बंध घातले होते. तथापि, महाराष्ट्र शासनाने दिनांक १७.०६.२०१७ रोजीच्या अधिसूचनेद्वारे तसेच दिनांक २२.०९.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये ऑटोरिक्षा परवान्यावरील निर्बंध उठवून परवाने खुले करण्याचे मुक्त धोरण अवलंबिले आहे. राज्यात एकूण ८,३९,४६९ ऑटोरिक्षांचे परवाने असून एकूण ७,४०१ ऑटोरिक्षा स्टँड आहेत.
(३) ऑटोरिक्षा संघटना, लोकप्रतिनिधी तसेच प्रवाशांकडून रिक्षा स्टँडची मागणी प्राप्त झाल्यास संबंधित प्रादेशिक / उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयातील मोटार वाहन निरीक्षक, संबंधित महानगरपालिकेचे प्रतिनिधी, पोलीस (वाहतूक) विभागाचे प्रतिनिधी व रिक्षा संघटनेचे प्रतिनिधी यांच्यामार्फत मागणी केलेल्या रिक्षा स्टँडचे संयुक्त सर्वेक्षण केले जाते. तद्नंतर सदर विषयांकित बाब संबंधित प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाच्या बैठकीत सादर करुन सदर स्टँडला मान्यता दिली जाते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**फुरसुंगी (जि.पुणे) येथील उरुळी देवाची नगर परिषद हद्दीत**
**वाढीव पाणीपुरवठा योजना मान्य करण्याबाबत**

**(१२) ४८५६ (०१-०५-२०२५). श्री.विजयबापू शिवतारे (पुरंदर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नव्याने निर्मित फुरसुंगी (जि.पुणे) येथील उरुळी देवाची नगर परिषद हद्दीत पिण्याच्या पाण्यासाठी पुणे मनपा मार्फत वाढीव पाणीपुरवठा योजना मान्यतेसाठी नगरविकास विभागाकडे सादर करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त वाढीव पाणीपुरवठ योजनेस मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-१२-२०२५) :** (१), (२) व (३) नगरोत्थान महाभियानांतर्गत फुरसुंगी शहराचा पाणीपुरवठा प्रकल्पाचा प्रस्ताव फुरसुंगी नगरपरिषदेने विहित मार्गाने नगरपरिषद प्रशासन संचालनालयामार्फत शासनास सादर केला आहे.

प्रस्तुत प्रकल्पाच्या अनुषंगाने नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेची स्वहिस्सा उभारण्याची आर्थिक स्थिती व राज्यातील इतर नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडून या महाभियानांतर्गत प्राप्त प्रकल्पांची मागणी या बाबी विचारात घेऊन प्रस्तुत प्रकल्पाच्या अनुषंगाने याबाबत शासन स्तरावरील निर्णय घेण्यात येईल.

---

## राज्यातील विनाअनुदानीत शाळांना अनुदान मिळणेबाबत

**(१३) ४८६४ (०५-०५-२०२५). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या शालेय शिक्षण विभागाने राज्यातील विनाअनुदानीत शाळांना माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये अनुदान देण्याचा निर्णय घेतला असताना देखील पटसंख्या अभावी शाळा अनुदानास अपात्र ठरविल्यामुळे मागील १५ ते २० वर्षांपासून विनाअनुदानीत शाळेत विनावेतन शिक्षक काम करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत राज्य शिक्षक संघर्षकृती समितीने मा.मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, शिक्षण मंत्र्यांना लेखी निवेदन देऊनही अद्याप यावर कोणतीच कार्यवाही झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार विनाअनुदानीत शाळांना अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (३१-१०-२०२५) :** (१), (२) व (३) शासन निर्णय, दिनांक १५.११.२०११, दिनांक १६.०७.२०१३ दिनांक ०४.०६.२०१४ व दिनांक १४.०८.२०१४ अन्वये शाळांना अनुदानासाठी मुल्यांकनाचे निकष ठरविण्यात आले आहेत. सदर निकषांनुसार पात्र शाळांवरील अनुज्ञेय पदांना वेतन अनुदान अनुज्ञेय आहे. अनुदान पात्रतेच्या निकषांनुसार अपात्र होणाऱ्या शाळांवरील पदांना संबंधित खाजगी संस्थांकडून वेतन अदा करण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## डिजिटल विद्यापीठ स्थापन करण्याबाबत

**(१४) ४९१३ (२९-०४-२०२५). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विद्यार्थ्यांना आकर्षक व दर्जेदार शिक्षण मिळावे याकरिता डिजिटल विद्यापीठ स्थापन करण्यात येणार असल्याचे माहे जानेवारी २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे डिजिटल विद्यापीठात रूपांतर करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यापीठासांठी इंटरनेट सुविधां तसेच ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना सुलभ आणि योग्य शिक्षण देण्यासाठी शासनामार्फत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (२०-११-२०२५) :** (१) खरे आहे.

(२) खरे आहे.

(३) सद्य:स्थितीत डिजीटल विद्यापीठ स्थापन करण्याबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाच्या स्पष्ट सुचना नाहीत.

सबब महाराष्ट्रात डिजीटल विद्यापीठ स्थापन करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाला दिनांक १५.०४.२०२५ रोजीच्या पत्रान्वये प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात रात्रपाळी काम करण्याऱ्या आरोग्य सेविकांना सुरक्षा देणेबाबत**

**(१५) ४९२८ (२४-०४-२०२५). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आरोग्य सेविकांना प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रावर रात्रपाळी काम करावे लागत असून त्यावेळी इतर कर्मचारी हजर नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामीण भागात प्राथमिक आरोग्यकेंद्र व उपकेंद्रावर आरोग्य सेविकांना रात्रपाळीचे काम करीत असताना त्यांच्या सुरक्षेचा प्रश्न उद्भवतो व अनुचित प्रकार घडत आहेत हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय चौकशी अंती काय आढळून आले त्याअनुषंगाने सदर ठिकाणी रात्रपाळी काम करणाऱ्या आरोग्य सेविकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने शासनाकडून कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर (२७-११-२०२५) :** (१) हे खरे नाही.

प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर आरोग्य सेविका रात्रपाळी डयुटी करत असताना, प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्रातील रात्रपाळी डयुटीवर असणारे पुरुष/महिला परिचर तसेच वाहनचालक इत्यादी अधिकारी/कर्मचारी उपस्थित असतात.

(२) हे खरे नाही.

(३) लागू नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बोरगाव (वसू) (जि.चिखली) (जि.बुलढाणा) या गावामध्ये रोपवाटिका तात्काळ कार्यरत करण्याबाबत**

**(१६) ४९३० (२५-०४-२०२५). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरगाव (वसू) (जि.चिखली) (जि.बुलढाणा) या गावामध्ये वन विभागामार्फत चालवली जाणारी डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोपवाटिका मागील दोन वर्षापासून बंद अवस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रोपवाटिकामध्ये आजूबाजूच्या ८ गावांतील २५ मजूर दररोज काम करीत होते, परंतू ही रोपवाटिका बंद असल्यामुळे तेथील मजुरांना काम मिळत नसल्याने त्यांच्यावर उपसमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन रोपवाटिका तात्काळ कार्यरत करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा उपाययोजना करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

**श्री. गणेश नाईक (२०-०८-२०२५) :** (१) हे खरे नाही.

चिखली तालुक्यातील बोरगाव (वसु) या गावामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर शासकीय रोपवाटिका मागील दोन वर्षात नियमीत सुरू आहे. सदर रोपवाटिकेमध्ये मागील दोन वर्षात विविध योजनेंतर्गत एकूण १,३०,००० रोपे निर्मिती करण्यात आली असून एकूण ६५५२ मनुष्य दिवस निर्मिती करण्यात आले आहेत.

(२) हे खरे नाही.

मौजे बोरगाव (वसु) रोपवाटिकेमध्ये मग्रारोहयो योजनेंतर्गत फक्त बोरगाव (वसू) या गावामधील मजूर कामावर येतात. सदर रोपवाटिका मागील दोन वर्षात नियमित सुरु असल्यामुळे मजुरांना नियमित रोजगार उपलब्ध होत आहे. मग्रारोहयो अंतर्गत मजूर त्यांच्या इच्छेनुसार कामावर येतात.

(३) मग्रारोहयो योजनेंतर्गत मौजे बोरगाव (वसु) रोपवाटिकेमध्ये माहे मार्च-२०२५ पासून ३०,००० लहान रोपनिर्मिती करणे या कामास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली असून सदर कामाचा संकेतांक तयार करण्यात आला आहे.

मग्रारोहयो योजनेअंतर्गत सन २०२४-२५ मध्ये सुरु असलेल्या उंच रोपनिर्मिती कामाचे अंतिम हजेरी पत्रक दिनांक १२.११.२०२४ ते दिनांक १८.११.२०२४ या कालावधीचे असून सदर हजेरी पत्रकावर एकूण ३८ मजूर कामावर हजर होते. तसेच दिनांक १४.०५.२०२५ ते २०.०५.२०२५ या कालावधीमध्ये १५ मजूरांचे मस्टर जनरेट करुन सुध्दा ८ मजूर कामावर हजर झाले असून मंजूर अंदाज पत्रकानुसार रोपनिर्मितीचे पुढील कामे सुरु करण्यात आलेली आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वसमत (जि.हिंगोली) तालुक्यातील पंचायत समितीसमोरील जागा नगरपरिषदेच्या नावे सातबारा उताऱ्यावर लावण्याबाबत

**(१७) ४९४० (०१-०५-२०२५). श्री.चंद्रकांत ऊर्फ राजुभैय्या रमाकांत नवघरे (बसमत) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसमत (जि.हिंगोली) तालुक्यातील पंचायत समितीसमोरील सर्व्हे नं.१५१/१ मधील ४ एकर २७ गुंठे जमिन वसमत नगरपालिकेस पाणीपुरवठा व इतर विकास कामासाठी सन १९६४ मध्ये शासनाने हस्तांतरीत केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील जागेपैकी १ एकर जागा जिनिंग फॅक्टरीसाठी ११ महिन्याच्या करारानुसार लिजवर वसमत नगरपरिषदेने सन १९६८ मध्ये नगरपालिकेच्या ठरावानुसार देण्यात आलेली असल्याने या जागेवर नगरपरिषदेचे नाव सातबारा उताऱ्यावर टाकावयाचे राहून गेल्यामुळे तत्कालीन विभागीय आयुक्तांनी नगरपरिषदेचे नाव सातबारावर लावण्यासंदर्भात आदेश दिले होते, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, या जागेवर नगरपरिषदेचे नाव सातबारा उताऱ्यावर टाकावयाचे राहून गेल्यामुळे अन्य इसमाने त्या जमिनीपैकी काही भागावर सिमेंट पोल उभे करुन त्यावर कुंपन करण्यात आल्याचे दिनांक ३१ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, वसमत पंचायत समितीसमोरील जागेसंदर्भात माहिती करुन घेऊन नगरपरिषदेचे नावे सातबारा उताऱ्यावर लावण्याबाबत आवश्यक ती कारवाई करण्यात येईल असे मुख्याधिकारी, वसमत, नगरपरिषद यांनी निदेश दिले असल्याने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-१२-२०२५) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

(४) सदर प्रकरणी वसमत नगरपरिषदेमार्फत आवश्यक ती कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात सामाजिक न्याय विभागाच्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांना सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१८) ५०३९ (२९-०४-२०२५). श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सामाजिक न्याय विभागाच्या वसतिगृहात सोयी-सुविधांमध्ये सूधारणा करुन विद्यार्थ्यांना अधिक चांगल्या पद्धतीने शिक्षण घेता यावे यासाठी विशेष प्रयत्न केले जात आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अंतर्गत येणाऱ्या वरळी येथील संत मीराबाई मुलींचे शासकीय वसतिगृह, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुलांचे शासकीय वसतिगृह तसेच मुलांचे शासकीय वसतिगृहाच्या इमारतींचा पुनर्विकास करुन विद्यार्थ्यांना कमीत-कमी २०० ते २५० चौरस फूट इतकी जागा प्रत्येक खोलीत उपलब्ध करुन दिली जाणार असल्याबाबतची सामाजिक न्याय मंत्री महाराष्ट्र राज्य यांनी माहिती दिली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वरळी येथील शासकीय वसतिगृहातील खोलीत पुरेशी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच तेथील चांगल्या कॉट, गाद्या व कपाटे, कॉम्प्युटर, स्पर्धा परिक्षांची पुस्तके यांसारख्या सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने सामाजिक न्याय विभागाअंतर्गत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय शिरसाट (२७-११-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

सामाजिक न्याय विभागांतर्गत, मुंबई येथील बीडीडी चाळ, वरळी येथे खालीप्रमाणे ३ शासकीय वसतिगृहे सुरू आहेत.

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुलांचे शासकीय वसतिगृह , बीडीडी चाळ, वरळी,

२) संत मीराबाई मुलींचे शासकीय वसतिगृह, बीडीडी चाळ, वरळी.

३) मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह, बीडीडी चाळ, वरळी

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा) यांच्या मार्फत बीडीडी चाळींचा पुर्नविकास सुरू आहे. सदर पुनर्विकास प्रकल्पांतर्गत विभागातील ३ शासकीय वसतिगृहांच्या जागेवर १००० विद्यार्थी क्षमतेचे मुलांचे वसतिगृह व ५०० विद्यार्थी क्षमतेचे मुलींचे वसतिगृह बांधकामाकरिता वाढीव चटई क्षेत्र उपलब्ध करून देण्याची विनंती नगर विकास विभागास करयात आलेली आहे.

(३) व (४) शासन निर्णय, दिनांक २६ जुलै, २०११ अन्वये सामाजिक न्याय विभागांतर्गत शासकीय वसतिगृहातील प्रवेशित विद्यार्थ्यांची निवासी व्यवस्था, सकाळी नाष्टा, दोन वेळचे पोटभर जेवण, विद्यार्थ्यांना दैनंदिन खर्चासाठी निर्वाह भत्ता, शैक्षणिक साहित्य, शालेय गणवेश, वैद्यकीय साहित्य, रेनकोट, गमबूट, कला शाखेतील विद्यार्थ्यांसाठी चित्रकला, संगीत इत्यादीसाठी रक्कम उपलब्ध करून देण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोंदिया जिल्ह्यातील अतिदुर्गम व नक्षलप्रभावित क्षेत्रातील शाळांमध्ये शिक्षकांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(१९) ५०६१ (०५-०५-२०२५). श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्ह्यातील अतिदुर्गम, नक्षलप्रभावीत व अतिसंवेदनशील क्षेत्रातील आमगांव, सालेकसा व देवरी तालुक्यातील शिक्षकांची पदे मोठ्या प्रमाणात रिक्त असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पंचायत समिती देवरी अंतर्गत उच्च श्रेणी मुख्याध्यापक, पदवीधर शिक्षक व सहायक शिक्षकांची एकूण ८९ पदे, पंचायत समिती सालेकसा अंतर्गत एकूण ८५ पदे व पंचायत समिती आमगाव अंतर्गत एकूण ८५ पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रिक्त पदांमुळे आदिवासी नक्षल प्रभावीत क्षेत्रातील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा कमी होत असून विद्यार्थी अन्य विपरीत मार्ग स्वीकारत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शाळांमध्ये रिक्त असलेली अनेक शिक्षकांची पदे भरण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१७-१०-२०२५) :** (१) होय हे खरे आहे.

(२) जिल्हा परिषद गोंदीया अंतर्गत संचमान्यता २०२३-२४ नुसार आमगांव, सालेकसा व देवरी तालुक्यांतर्गत मुख्याध्यापक ८, सह शिक्षक १८९ व पदविधर शिक्षक ७५ या प्रमाणे पदे रिक्त आहेत. जिल्ह्यात शाळांवर ८० स्वयंसेवक नियुक्त करण्यात आलेले आहेत.

(३), (४) व (५) शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी २०२५ घेण्यात आली असून, त्याअधारे शिक्षक भरतीची पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे. तसेच पेसा अंतर्गत भरती प्रक्रियेला मा.सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल असल्याने शिक्षक भरतीची प्रक्रिया स्थगित आहे. यास्तव विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून दिनांक १५.०७.२०२४ च्या शासन पत्रान्वये कंत्राटी स्तरावर मानधनावर पेसा अंतर्गत शिक्षक भरतीची परवानगी देण्यात आलेली आहे.

---

**राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत १० वर्षांपेक्षा जास्त सेवा झालेल्या वैद्यकीय अधिकारी व “दंतशल्यचिकित्सक” यांची सेवा नियमित करण्याबाबत**

**(२०) ५०९८ (३०-०४-२०२५). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत १० वर्षे पेक्षा जास्त सेवा झालेल्या “वैद्यकीय अधिकारी (BHMS (Bachlor of Homepathy medicine and Surgery))” व “दंतशल्यचिकित्सक” यांची अंतिम सेवाज्येष्ठता यादी जाहीर करून सेवा नियमित करण्यासंदर्भातील निर्णय शासनाने दिनांक १४ मार्च, २०२४ रोजी वा त्यासुमारास शासन निर्णय काढून घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २० जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन उक्त वैद्यकीय अधिकारी (BHMS (Bachlor of Homepathy medicine and Surgery))” व “दंतशल्यचिकित्सक” यांची सेवा नियमित करण्याबाबत कोणती

कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर (१३-०१-२०२६) :** (१), (२) व (३) राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत राज्यातील कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांचे सार्वजनिक आरोग्य विभागाच्या नियमित पदावर समावेशन करण्याबाबत लोकप्रतिनीधींनी मागणी केली आहे. राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत राज्यातील कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या समावेशनाबाबत धोरणात्मक शासन निर्णय दिनांक १४.०३.२०२४ अन्वये निर्गमित करण्यात आला आहे. तथापि, सदर शासन निर्णयात सुधारणा करण्यात येवून दिनांक ०४.११.२०२५ रोजीचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. त्यानुसार दिनांक १४.०३.२०२४ रोजी राष्ट्रीय आरोग्य अभियानामधील १० वर्ष सेवा पुर्ण झालेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांचे समकक्ष पदावर सार्वजनिक आरोग्य विभागातील पदाबरोबर ग्रामविकास विभागामार्फत भरण्यात येणाऱ्या आरोग्य सेवेतील रिक्त पदावर एकवेळची विशेष बाब म्हणून समावेशन करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत BHMS (Bachelor of Homeopathy medicine and Surgery) व "दंतशल्यचिकित्सक" या संवर्गासह अन्य संवर्गाच्या सेवा समावेशनाबाबतची कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जनाई, शिरसाई (ता. दौंड, जि. पुणे) उपसा सिंचन योजनेची बंदिस्त पाईपलाईन मौजे कौठडी, पर्यंत करण्याबाबत

**(२१) ५११२ (०१-०५-२०२५). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे कौठडी (ता. दौंड, जि. पुणे) येथील जनाई शिरसाई उपसा सिंचन योजनेची बंदिस्त पाईपलाईन भोळोबावाडी ते केसकरवस्ती पर्यंत करण्याबाबतची मागणी येथील नागरिकांनी व स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ७ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१३-०१-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) शासन निर्णय क्रमांक : प्रमाप-२०२४/ (प्र.क्र.५२४/२०२४)/सिंव्य (कामे), दिनांक २५/०२/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये जनाई शिरसाई उपसा सिंचन योजना ता.दौंड, बारामती व पुरंदर जि.पुणे योजनेच्या पारंपारिक कालव्यांना बंदिस्त नलिका वितरण प्रणालीमध्ये रुपांतरण करणेच्या कामासाठी विस्तार व सुधारणा अंतर्गत प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

सदरील प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावामध्ये केसकर वस्ती तलावास बंदिस्त नलिका करणे प्रस्तावित नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर जिल्ह्यातील ग्रामपंचायतींनी दारूबंदीचे ठराव नियमानुसार करत नसल्याबाबत

**(२२) ५२३० (२९-०४-२०२५). श्री.समाधान आवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील ग्रामपंचायतींनी ग्रामसभा बोलावून दारूबंदीचे ठराव नियमानुसार केले नसल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गावातील महापालिका, नगरपालिका, नगरपरिषदेच्या वार्डातील दारूबंदीचा ठराव करताना शासनाच्या दिनांक १२ फेब्रुवारी, २००९ च्या अधिसूचनेनुसार कार्यवाही आवश्यक असून त्यानुसार ठराव झाल्यास तो संबंधीत गावांना लागू होतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्ह्यातील दारूबंदीचे ठराव नियमानुसार करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार (१२-११-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ अंतर्गत मुंबई दारुबंदी (ग्रामसभा ठराव पारित केल्यामुळे अथवा नगरपरिषद/ महानगरपालिकेच्या वॉर्डातील मतदारांनी निवेदन दिल्यामुळे अनुज्ञप्ती बंद करणे) आदेश दिनांक २५.०३.२००८ आणि सुधारणा आदेश दिनांक १२.०२.२००९, दिनांक १६.०८.२०१६ व दिनांक ०६.०६.२०१७ नुसार प्रक्रिया विहीत केली असून त्यानुसार कार्यवाही होणे आवश्यक आहे. (३) जिल्ह्यातील दारुबंदीचे ठराव नियमानुसार करण्याच्या दृष्टीने प्राप्त प्रस्तावांच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे : (i) सोलापूर जिल्ह्यात दारुबंदीबाबचा ठराव वा दारुबंदीबाबतच्या तक्रारी प्राप्त झाल्यास शासन आदेश दिनांक २५.०३.२००८ व त्यातील दुरूस्ती आदेशांच्या अनुषंगाने रीतसर प्रक्रिया राबविण्याबाबत मार्गदर्शन राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांमार्फत करण्यात येते. (ii) सोलापूर जिल्ह्यात मौजे टाकळी (लक्ष्मी) येथे दारूबंदी करण्यास्तव दिनांक ०९.०२.२०२५ रोजी ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते. तथापि, सदर ग्रामसभेस बहुतांश मतदार अनुपस्थित होते. (iii) सोलापूर जिल्ह्यातील तोंडले गावातील दिनांक १८.०२.२०२५ रोजीच्या तक्रारीच्या अनुषंगाने दारुबंदीसाठी आवश्यक शासन आदेशाची माहिती देण्यात आलेली आहे. तद्नंतर, कोणताही लेखी प्रस्ताव अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, सोलापूर कार्यालयास प्राप्त नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाशी संलग्न असलेल्या जिल्हा रुग्णालयात रुग्णांवर मोफत उपचार मिळणेबाबत

**(२३) ५२४७ (२८-०४-२०२५). श्री.कैलास घाडगे पाटील (धाराशिव) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाशी संलग्न असलेल्या जिल्हा रुग्णालयात रुग्णांना मोफत उपचार मिळत नसल्याने त्यांना स्वखर्चाने उपचार घ्यावे लागत असल्याने रुग्णांना व नातेवाईकांना नाहक आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सार्वजनिक आरोग्य विभागाप्रमाणेच वैद्यकीय शिक्षण विभागाने सुद्धा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाशी संलग्न असलेल्या जिल्हा रुग्णालयात रुग्णांवर मोफत उपचार करणेबाबत लोकप्रतिनीधी यांनी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (१५-०९-२०२५) :** (१) नाही. विभागाच्या शासन निर्णय दिनांक ०४.०७.२०१७ नुसार समाजातील, गरीबीरेषेखालील कुटुंबे, वंचित, पीडीत गट, दुर्धर आजारांनी ग्रस्त, निराधार व्यक्ती, स्वातंत्र्यसैनिक व तत्सम गटांना मोफत उपचार सेवा देण्यात येत आहे.
(२) होय.
(३) विभागाच्या शासन निर्णय दिनांक ०४.०७.२०१७ नुसार समाजातील, गरीबीरेषेखालील कुटुंब, वंचित, पीडित, दुर्धर आजारांनी ग्रस्त, निराधार व्यक्ती, स्वातंत्र्यसैनिक व तत्सम गटांना मोफत उपचार सेवा देण्यात येत आहे. तसेच याबाबतची माहिती रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना स्पष्टपणे कळावी म्हणून रुग्णालयातील प्रमुख स्थळी माहितीफलक लावण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

रुग्णांकडून मिळणारे विविध शुल्क संस्थेच्या स्वीय प्रपंजी खात्यात जमा केले जातात आणि शासन निर्णय दिनांक ०४.०३.२०२० नुसार या निधीतून तातडीचे प्रसंगी औषधे, सर्जिकल साहित्य खरेदी, यंत्रसामुग्री देखभाल/दुरुस्ती, प्रलंबित विद्युत देयके इत्यादी बाबीवर खर्च केला जातो.
(४) लागू नाही

---

**राज्यातील गोंदिया जिल्ह्यातील कचारगड व धनेगाव या ठिकाणी आदिवासींच्या विकासासाठी कायमस्वरुपी सोयी-सुविधा निर्माण करण्याबाबत**

**(२४) ५२५२ (२७-०४-२०२५). श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील गोंदिया जिल्ह्यातील कचारगड व धनेगाव हे ठिकाण आशिया खंडातील आदिवासींची गुफा असून निसर्गनिर्मित एकमेव देवस्थान असलेले नक्षलक्षेत्र येथे दरवर्षी पाच दिवसाचे कोयापुनेम महासंम्मेलन व सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन केले जाते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येथे दरवर्षी यात्रेला वर्षभर भारतातील लोक येतात जातात, परंतु यासाठी येणारा अत्यल्प निधी, वनविभागाच्या अडचणीमुळे तसेच सोयी-सुविधांच्या अभावामुळे भाविकांना त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन आदिवासींच्या या प्रसिद्ध स्थळाच्या विकासासाठी कायमस्वरुपी सोयी-सुविधा निर्माण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा उपाययोजना करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.डॉ. अशोक उईके (०९-१२-२०२५) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) मौजा कचारगड देवस्थान येथे भक्त निवास बांधकाम करणे या कामाला रू. ३०२.०० लक्ष इतका निधी मंजुर झाला आहे. सदर कामासाठी गट क्र.३ मधील आर जी ६४.१४ पैकी प्रस्तावित क्षेत्र हे. आर पैकी ०.३७१ जमिन भक्त निवास बांधकामासाठी उपवन संरक्षक, गोंदिया वन विभागाकडून प्राप्त झालेली आहे. सदर ठिकाणी रस्त्यांची बांधकामे, संरक्षण भिंतींची बांधकामे, भोजन कक्षाचे बांधकाम, पिण्याच्या पाण्याची सुविधा व Construction of bridge storage tank at Kachargad ही कामे पुर्ण झाली आहेत.

केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजनेंतर्गत माँ काली कंकाली कोपार लिंगो देवस्थान कचारगड ता. सालेकसा येथे

यात्रे दरम्यान आवश्यक व्यवस्था करण्याकरीता सन २०२१-२२ मध्ये ०३.०० लक्ष, सन २०२२-२३ मध्ये रू. ०५.०० लक्ष, सन २०२३-२४ मध्ये रू. ०४.०० लक्ष तसेच सन २०२४-२५ मध्ये रू. १०.०० लक्ष निधी यात्रेदरम्यान आवश्यक बाबींवरती खर्च करण्याकरीता देवस्थान समितीला उपलब्ध करून देण्यात आला आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही,

---

**नाशिक जिल्ह्यात वनक्षेत्र होण्याच्या मार्गावर असल्याबाबत**

**(२५) ५२७१ (२७-०४-२०२५). श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्ह्यात वनक्षेत्र वाढलेले असून अनेक वनस्पतींच्या प्रजाती असून त्या नामशेष अथवा नष्ट होण्याच्या मार्गावर असल्याचे इंडिया स्टेट ऑफ फॉरेस्टच्या तपासणीत आढळून आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच जंगलात वणवा लागून दुर्दैवी घटनाही घडत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन या सर्व प्रकारच्या दुर्मिळ व औषधी वनस्पतीचे संवर्धन करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा उपाययोजना करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक (०३-०७-२०२५) :** (१) नाशिक जिल्ह्यात वनक्षेत्र ८.०५ चौ.कि.मी. क्षेत्राने वाढ झाली आहे. नाशिक (प्रा.) वनवृत्तातील पश्चिम घाट क्षेत्रातील जैवविविधता जतन करण्यासाठी राज्य शासनाने अंजनेरी, त्रंबकेश्वर, ईगतपुरी तसेच पुर्व भाग नाशिक मध्ये बोरगड, ममदापुर, सुरगणा, पेठ व वणी संवर्धन राखीव क्षेत्र अधिसूचित केले आहेत जेणेकरुन सदर वनक्षेत्रातील जैविविधतेचे संरक्षण करणे शक्य होईल.
(२) व (३) नाशिक पश्चिम व पूर्व वनक्षेत्रात सन २०२२ ते २०२४ या तीन वर्षात एकूण १३६२ आगीच्या आकस्मिक घटना घडल्याचे निदर्शनास आले आहे.

आगीच्या घटना घडू नयेत यासाठी खालील उपाययोजना करण्यात येतात:-

१. आग संवेदनशिल क्षेत्रात जाळरेषा घेण्यात येवून फायर वॉचरची नियुक्ती करण्यात येते.

२. वनतील आग वनात पसरु नये यासाठी रस्ता दुतर्फा व नियतक्षेत्रात ६ मी. रुंदीची व १२ मी. रुंदीची जाळरेषा घेण्यात येते त्यामुळे आकस्मिक वनवणवा घडल्यास तात्काळ आटोक्यात आणण्यास मदत होते.

३. फॉरेस्ट सर्वे ऑफ इंडियाच्या संकेत स्थळावर वनकर्मचारी यांची नोंदणी करण्यात आलेली असुन Satellite व्दारे आगीच्या घटनांचे अलर्ट प्राप्त होताच तातडीने कारवाई केली जात आहे.

४. वनकर्मचा-यां मार्फत जंगल परिसरात दिवस व रात्रीची गस्त घालुन आग लागु नये याबाबतची दक्षता घेतली जाते. आग लागल्यास तात्काळ वनकर्मचारी व ग्रामस्थांच्या मदतीने आग आटोक्यात आणली जाते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे आखतवाडे, (ता.पाचोरा, जि.जळगांव) येथील प्रशासन जमा झालेला भूखंड परत मिळण्याबाबत**

**(२६) ५३६७ (२९-०४-२०२५). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे आखतवाडे, (ता.पाचोरा, जि.जळगांव) येथील शासन जमा झालेला ५५ नागरिकांना दिलेला भूखंड

१५००/३००० स्वे.फूट परत त्यांना मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २ फेब्रुवारी, २०२५ रोजीच्या सुमारास  महसूल राज्यमंत्री, यांना लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त लेखी निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१४-१२-२०२५) :** मा.श्री. किशोर आप्पा पाटील, आमदार पाचोरा-भडगाव यांनी मौजे आखातवाडे ता. पाचोरा जि. जळगाय येथे महाराष्ट्र शासनाने गावातील गरजु शेतकरी, कामगार वर्ग लोकांसाठी १५००/३००० स्वे. फुटचे भूखंड शासनाने ठरवुन दिलेल्या किंमतीत (रु.१५००/-) दिले असून, ते त्याचा उपभोग सुध्दा घेत आहेत. त्यांच्यावर आजही त्यांचा ताबा आहे. परंतु गावातुन विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांच्याकडे लेखी स्वरुपात तक्रार केल्यामुळे सदरील भूखंड सरकार जमा करण्यात आला आहे. मौजे आखतवाडे ता.पाचोरा जि. जळगाव येथील सरकार जमा झालेला ५५ नागरिकांना दिलेला भूखंड १५००/३००० स्वे.फु. त्यांना परत मिळणेबाबत २ फेब्रुवारी, २०२५ रोजी मा.मंत्री महसूल महाराष्ट्र राज्य यांना लेखी निवेदन दिले आहे.

सदर प्रकरणी या कार्यासनाच्या शासन पत्र क्र. संकीर्ण/३२२५/प्र.क्र.४६/ज-६अ दिनांक २०/०२/२०२५ अन्वये नियमानुसार नियमोचित कार्यवाही करावी व त्यासंदर्भातील वस्तुस्थितीदर्शक अहवाल / माहिती शासनास सादर करणेकामी जिल्हाधिकारी, जळगांव यांना विनंती करण्यात आलेली होती. त्याअनुषंगाने उप जिल्हाधिकारी (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालया, जळगांव यांच्या दिनांक ०६.०३.२०२५ च्या पत्रान्वये सदर प्रकरणाबाबतचा अहवाल प्राप्त झालेला आहे.

तहसिलदार पाचोरा यांनी त्यांच्या क्र.जमीन-१/कावि/४२५/२०२५, दिनांक ०४.०३.२०२५ अन्वये पुढीलप्रमाणे अहवाल सादर केलेला आहे.

उपविभागीय अधिकारी, पाचोरा भाग, पाचोरा यांचेकडील आदेश क्रमांक गावठाण/१०९९/एसआर/२३९९ दिनांक ०९.११.१९९९ अन्वये तहसिलदार पाचोरा यांचेकडील आदेश जमीन/१/गावठाण/कावि/११४१/९९ दिनांक १६.११.१९९९ अन्वये मौजे आखतवाडे ता. पाचोरा येथील तृतीय दशवार्षिक कार्यक्रम सन ९५/९६ गावठाण विस्तार अंतर्गत गावठाण वाढीसाठी खाजगी मालकीची जमीन संपादन करण्यात आली आहे. त्यानुसार पात्र लाभार्थींना भूखंड मंजुर झालेले आहेत.

भुखंड क्षेत्र ३०X३०=९०० चौ. फुट चे एकुण ३४ भूखंड रक्कम रुपये ९००/- प्रमाणे एकूण वसुल करावयाची रक्कम ३०,६००/-, भुखंड क्षेत्र ३०X५० = १५०० चौ. फुट चे ७६ भूखंड रक्कम रुपये १५००/- प्रमाणे एकूण वसुल करावयाची रक्कम ११४०००/-, ५०X६०=३००० चौ. फुट चे २४ भूखंड रक्कम रुपये ३०००/- प्रमाणे एकुण वसुल करावयाची रक्कम ७२०००/- असे फेरफार क्र.७०२ चे नोंदीत नमुद आहे.

श्री. रुपसिंग गुलाबसिंग राजपुत रा. आखातवाडे ता. पाचोरा यांनी तक्रारी अर्ज दाखल केलेला होता. सदर अर्जाचे संदर्भात उपविभागीय अधिकारी, पाचोरा भाग पाचोरा यांचेमार्फत चौकशी करण्यात आलेली आहे. मौजे आखातवाडे येथील गावठाण विस्तार योजनेंतर्गत दिनांक ०९.११.१९९९ च्या आदेशान्वये वाटप केलेल्या भूखंडधारकांपैकी ५५ लाभार्थी अपात्र असल्याचा अहवाल उपविभागीय अधिकारी, पाचोरा भाग यांनी त्यांच्याकडील दिनांक १९.०७.२००१ चे पत्रान्वये सादर केलेले आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव यांच्या आदेश दिनांक ०९.१०.२००१ नुसार ५५ अपात्र लाभार्थ्यांना वाटप केलेले प्लॉट सरकार जमा करण्यात आलेले होते.

तसेच सदर आदेशाविरुद्ध एकूण ३४ भुखंडधारकांनी अपर आयुक्त, नाशिक विभाग यांचेकडे अपील दाखल करण्यात आले. सदर अपिलामध्ये प्रथम सुनावणी दिनांक १८.०१.२००२ रोजी घेण्यात आली त्यानुसार

सदरचे प्लॉट शासन जमा करण्याचे दिनांक ०९.१०.२००१ च्या आदेशास दिनांक ०४.०३.२००२ चे आदेशान्वये अंतरीम स्थगिती देण्यात आलेली होती. त्यानुसार फेरफार क्र. ७३१ प्रमाणे करण्यात आलेला आहे.

तथापि दोन्ही पक्षांचे युक्तीवाद व कागदपत्रावरुन सदरचा आदेश प्रशासकीय स्वरुपाचा असल्याने अपील अर्ज दिनांक १४.०८.२००२ चे आदेशान्वये फेटाळण्यात आला.

यापैकी ५५ प्लॉट पैकी सदर अपिलात ९ लाभार्थी यांचे प्लॉट पात्र ठरविण्यात आलेले आहेत. त्यानुसार सदर नोंदीमध्ये ९ लाभार्थी प्लॉटधारक यांचे उतारे त्यांच्या नावावर आहेत. सदर भूखंड सरकार जमा केलेल्या सर्व सभासदानी मा. दिवाणी न्यायालय, जळगाव येथे शासनाच्या विरोधात Civil Appeal No. ४५/२००८ दावा दाखल केला आहे व सदरील दावा मा. दिवाणी न्यायालय Dismiss करण्यात आलेला आहे.

तहसिलदार पाचोरा यांचेकडील अहवाल जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव यांच्याकडे प्राप्त झालेला आहे. त्यानुसार मौजे आखातवाडे ता. पाचोरा जि. जळगाव येथील गट नं.२७१/१/२७२/२७३/१/९९ यामधील तक्रार प्राप्त झाल्यानुसार प्रत्यक्ष जागेवर जाऊन स्थळपाहणी केली असता सदर जागेबाबत फेरफार क्रमांक ७३१ अन्वये अपर आयुक्त, नाशिक विभाग यांनी निकालपत्र क्रं. जमीन/अपिल/४७/२००१ दिनांक १४.०८.२००१ अन्वये नोंदीमध्ये रद्द केलेबाबत नमुद केलेप्रमाणे ५५ प्लॉटधारक यांचे प्लॉट आज रोजी बरेच शेतकरी, मजुर यांचे पत्राचे शेड (गोठे), वखळ जागा असल्याचे दिसुन आले. त्यात ५५ लाभार्थी पैकी ९ लाभार्थी यांचे प्लॉट त्यांचे नावावर असुन उर्वरीत ४६ प्लॉट यांचे पुढे सरकार नाव ७/१२ उता-यावर दिसुन येत आहे. तसेच आज रोजी सर्व ५५ प्लॉट धारकांचा ताबा व कब्जेउपभोग घेत असल्याचे प्रत्यक्षरीत्या दिसुन आलेला आहे. तरी मौजे आखातवाडे ता. पाचोरा येथील गट नंबर २७१/१/२७२/२७३/१/९९ यामधील ५५ प्लॉटधारकापैकी ४६ प्लॉटधारकांचे नाव ७/१२ उता-यावर सरकार असे नाव असुन आज रोजी प्रत्यक्ष कब्जेउपभोगात आहे व ९ प्लॉटधारक यांचे नाव ७/१२ उतारा असुन उपभोग घेत आहे.

---

## राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांसाठी अनुदान वितरण करण्याबाबत

**(२७) ५३७१ (०५-०५-२०२५). श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांना गेल्या अनेक वर्षांपासून म.रा.क्री.प. अंतर्गत अनुदान देणे बंद केले असून उपरोक्त स्पर्धांच्या आयोजनासाठी राज्यातील विविध संघटना लोक प्रतिनिधींकडे निधीची मागणी करत असतात व यासाठी लोकप्रतिनिधी हे आमदार स्थानिक विकास निधीतून निधी उपलब्ध करुन देत असतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाच्या नियोजन विभागाने दिनांक १६ सप्टेंबर, २०२४ रोजी काढलेल्या परिपत्रकात शासकीय अधिकाऱ्यांना तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार प्रदान केलेले असल्याने यापुढे लोकप्रतिनिधींना विविध स्पर्धेसाठी निधी उपलब्ध करून देता येणार नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शासन परिपत्रक रद्द करून पूर्वीप्रमाणे जिल्हाधिकारी व जिल्हाक्रीडा अधिकारी यांना तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार देऊन कोणत्या बाबींवर निधी खर्च करावा याचे मार्गदर्शन जिल्हा क्रीडा अधिकारी व सर्व लोकप्रतिनिधी यांना करण्यात यावे अशी मागणी लोकप्रतिनिधींनी मा. उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री दिनांक ७ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणात आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार (१९-०१-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र राज्य क्रीडा परिषद अंतर्गत सद्यस्थितीमध्ये राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी, महाराष्ट्र राज्य क्रीडा परिषदेची मान्यता असलेल्या राज्य संघटनांना अनुदान दिले जाते.

तसेच आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत जिल्हा, राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी निधी उपलब्ध करून देण्यात येतो.

(२) नाही, हे खरे नाही.

नियोजन विभागाच्या दिनांक १६ सप्टेंबर, २०२४ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये क्रीडा स्पर्धांना तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार क्रीडा स्पर्धेच्या प्रकारानुसार १) जिल्हास्तर स्पर्धा - जिल्हा क्रीडा अधिकारी २) राज्यस्तर स्पर्धा-विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा संचालनालय ३) राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तर स्पर्धा- आयुक्त/संचालक, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे यांना प्रदान करण्यात आलेले आहेत.

सदर स्पर्धांकरीता विहित वित्तीय मर्यादेपेक्षा अधिक निधी आवश्यक असल्यास तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार आयुक्त/संचालक, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे यांना प्रदान करण्यात आलेले आहेत.

आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत उपरोक्तप्रमाणे तांत्रिक मान्यता प्राप्त असणा-या क्रीडा स्पर्धांना निधी उपलब्ध करून देण्यात येतो.

(३) हे खरे आहे.

(४) आयुक्त, युवक व क्रीडा संचालनालय, पुणे यांचेकडून दिनांक ०३/०६/२०२५ रोजीच्या पत्रान्वये अभिप्राय मागविण्यात आलेले आलेले होते. त्यानुसार आयुक्त, युवक व क्रीडा संचालनालय, पुणे यांचेकडून दिनांक २० ऑगस्ट, २०२५ रोजीच्या पत्रान्वये या विभागास अभिप्राय प्राप्त झालेले आहेत. सदर अभिप्रायानुसार शासन स्तरावर योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**माथाडी कामगारांचे कामगार खात्यांतर्गत प्रलंबित असलेल्या प्रश्नांवर लवकरात लवकर निर्णय घेणेबाबत**

**(२८) ५३८४ (२४-०४-२०२५). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माथाडी कामगारांचे कामगार खात्यांतर्गत प्रलंबित असलेल्या प्रश्नांवर लवकरात लवकर निर्णय घ्यावा यासाठी लोकप्रतिनिधी, माथाडी कामगार संघटनांनी मा.कामगार मंत्री यांचेकडे दिनांक २९ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास भेट घेऊन निवेदनाव्दारे मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी माथाडी कामगारांच्या मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे तसेच प्रतिकुल परिस्थितीत काम करणाऱ्या माथाडी कामगारांच्या समस्या सोडविण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर (१०-१२-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) विविध माथाडी मंडळाची पुनरर्चना करणे, मंडळाच्या कार्यालयीन सेवेत माथाडी कामगारांच्या मुलाना प्राधान्य देणे,कामगार विभागाकडुन आदर्श माथाडी कामगार पुरस्कार मिळणे. नाशिक रेल्वेधक्क्यावरील माथाडी कामगारांच्या प्रश्नांची सोडवणूक करणे, अशा विविध मागण्या केल्या आहेत.

याप्रकरणी शासन स्तरावर वेळोवेळी बैठका संपन्न झाल्या असुन सदर बैठकांमधील निर्देशानुसार पुढील कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आयओटी (इंटरनेट ऑफ थिंग्स) च्या माध्यमातून खेडोपाडी पाण्याची माहिती संकलित करण्यात येणार असल्याबाबत**

**(२९) ५४८९ (२४-०४-२०२५). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आयओटी (इंटरनेट ऑफ थिंग्स) च्या माध्यमातून खेडोपाडी पाण्याची माहिती संकलित करण्यात येणार असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या यंत्रणेचा वापर नेमका कसा उपयोगात येणार आहे तसेच कधीपासून ही यंत्रणा कार्यान्वित करण्यात येणार आहे,
(३) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (१९-०१-२०२६) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
जल हे जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत आयओटी (इंटरनेट ऑफ थिंग्स) उपक्रम हाती घेण्यात आला आहे. केंद्र शासनाच्या निर्देशानुसार सद्यस्थितीत हा उपक्रम केवळ प्रादेशिक पाणी पुरवठा योजना (Multi-Village Schemes MVS) मध्ये हाती घेण्यात आला आहे. हा उपक्रम राज्यातील ३४ जिल्ह्यातील १००६ प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनांमधील सुमारे ७६९८ गावांसाठी राबविण्यात येत आहे. या १००६ योजनांमध्ये महाराष्ट्र जीवन प्राधीकरण यांच्याकडील ३८९ प्रादेशिक योजना (५९३७ गावे) व जिल्हा परिषदेकडील ६१७, प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना (१७६१ गावे) यांचा समावेश आहे.
(२) आयओटी (इंटरनेट ऑफ थिंग्स) ही उपक्रमाद्वारे ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनांद्वारे करण्यात येणाऱ्या दैनंदिन पाणी पुरवठ्याशी निगडीत बाबींचे अचूक मोजमाप तसेच नागरीकांना पाणी पुरवठ्यासंदर्भात देण्यात येणाऱ्या सुविधांचे संनियंत्रण करण्यासाठी राज्यातील योजनांना विविध प्रकारची सेंसर बसवून त्याद्वारे या योजनांचे संनियंत्रण करण्यासाठी एकात्मिक पध्दतीने (Centralised) आयओटी सोल्युशन राबविण्यात येत आहे. यामध्ये स्त्रोत, जलशुध्दीकरण केंद्र, क्लोरीनेशन युनिट, पाईप, साठवणूक तलाव/टाकी, घरगुती नळ जोडण्या इत्यादी विविध ठिकाणी वेगवेगळया पध्दतीची सेंसर व मिटर बसवून नळ पाणी पुरवठा योजनांचे संनियंत्रण व मोजमाप केले जाणार आहे. आयओटी सोल्युशनद्वारे नळ पाणी पुरवठा योजनांची शाश्वतता, पाणी पुरवठा सुविधांमध्ये सातत्य व नियमितता राखता येणार असुन, स्थानिक स्तरावर अडचणी आल्यास त्यावर लवकर उपाय योजना करता येऊ शकेल व त्याद्वारे नळ पाणी पुरवठा योजना यशस्वीरीत्या राबविल्या जाऊ शकतील.
सद्य:स्थिती पर्यंत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडील ५३ योजनामध्ये (५९६ गावे) अंमलबजावणी पूर्ण करण्यात आली आहे व २४३ योजनांमध्ये अंमलबजावणी प्रगतीपथावर आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील व जिल्हा परिषदेकडील उर्वरीत योजनांमध्ये सर्वेक्षणाचे काम पूर्ण करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वर्धा जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांची जमीन वेणा प्रकल्पात अधिग्रहित करुन आजच्या मोजमापानुसार मोबदला मिळण्याबाबत

**(३०) ५६४९ (२९-०४-२०२५). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **जलसंपदा(विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा व नागपूर जिल्ह्यातील वेणा प्रकल्पासाठी ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी अधिकृत केल्या त्यांना मागील २८ वर्षापासूनचे थकीत भूभाडे पट्टी आजच्या मोजमापानुसार देण्याची मागणी या प्रकल्प बाधितानी विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वर्धा जिल्ह्यातील सिंधी, कळमना, मारडा, बरबडी, काढळी, दिग्रज, विकणी, कृष्णापुर, गौळ, भोसा, उमरा, सालापूर व इतर सर्व शेतकऱ्यांची जमीन वेणा प्रकल्पात अधिकृत व अधिग्रहित केल्या त्या शेतकऱ्यांना सध्याच्या मोजमापानुसार भूभाडे देण्यात येणार आहे काय, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, काही शेतकऱ्यांच्या जमिनीचा ताबा कलम ४ नंतर घेण्यात आलेला असतानाही केवळ ना पेर प्रमाण पत्रांमध्ये संपादित जमिनीवर पेरणी केल्याचे नमूद करण्यात आल्याने या शेतकऱ्यांना शासकीय नियमानुसार ८ टक्के भूभाडे ही अद्याप देण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी प्रकल्प बाधित शेतकऱ्यांना मागील २८ वर्षापासून प्रलंबित असलेले थकीत भूभाडे पट्टी आजच्या मोजमापानुसार देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१२-०१-२०२६) :** (१) होय.

विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ कार्यालयांतर्गत येत असलेल्या वर्धा व नागपूर जिल्हयातील वेणा प्रकल्पासाठी ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी अधिकृत केल्या आहेत. त्यांना मागील २८ वर्षापासूनची थकीत भूभाडे पट्टी आजच्या मोजमापानूसार देण्याची मागणी या प्रकल्प बाधितांनी विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाकडे केली आहे.

(२) हे, खरे नाही.

भूभाडेची रक्कम ही नियमानुसार, जमिनीचा ताबा घेतल्याच्या दिनांकापासून ते कलम ४ च्या दिनांकापर्यंत निवाडयामध्ये नमूद जमिनीच्या मूळ किंमतीच्या ८ टक्के दराने परिगणित करण्यात येते. सद्य:स्थितीत गौळ, दिग्रस, पळसगाव, उमरा व सिंधी या गावांतील प्राप्त अर्जांची पडताळणी करुन एकूण २४ अर्जदारांचे भूभाडे मंजूर करण्यात आले आहे. परंतु, अद्याप एकाही अर्जदाराने भूभाडेची रक्कम उचल केलेली नाही.

(३) होय, हे खरे आहे.

भूभाडेची रक्कम ही नियमानुसार जमिनीचा ताबा घेतल्याच्या दिनांकापासून ते कलम ४ च्या दिनांकापर्यंत ८ टक्के दराने परीगणित करण्यात येते. कलम ४ नंतर ताबा घेण्यात आलेल्या जमिनीचे भूभाडे देय नाही.

(४) निम्न वेणा प्रकल्पाचे भुसंपादन जवळपास ३० वर्षे जुने असून सदर प्रकल्प सिंचन व्यवस्थापनासाठी सन २००५ मध्ये या प्राधीकरणांतर्गत नागपूर पाटबंधारे विभाग (दक्षिण) नागपूर या विभागाकडे हस्तांतरीत झालेला आहे व सन २०१५ मध्ये एकूण १९१ भुसंपादन प्रकरणे विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आले आहेत.

तथापि, भूभाडे मिळण्यासंबंधी विभागास एकूण ४२९ भुधारकांचे अर्ज प्राप्त आहेत व त्यानुषंगाने विभागाकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबतची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे:-

१) २५३ भूधारकांचे जमिनीचा ताबा कलम-४ नंतर घेतल्यामुळे वा संपादीत जमीनीवर पेरणी केल्यामूळे अर्ज नामंजूर झाले.

२) २४ भुधारकांचे अर्ज नियमानुसार मंजूर झाले असून अद्याप शेतकऱ्यांनी भूभाडेची रक्कम उचल केली नाही.

३) शोधाअंती ९७ भूधारकांचे निवाडा प्रत उपलब्ध नसल्यामुळे त्यांना भूभाडे देय आहे किंवा नाही याचा बोध होत नाही.

४) ५५ भुधारकांच्या अर्जासंबंधित नापेर प्रमाणपत्रामध्ये कालावधी नमूद नसल्यामुळे तसेच राजीनामा प्रत उपलब्ध नसल्याने  भूभाडे प्रस्ताव तयार करण्यात  करणे शक्य झाले नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वाघोदा (ता.रावेर, जि.जळगांव) येथे संदलच्या मिरवणुकीत सहभागी असलेल्या तरुणांनी बँनर फडकविल्याबाबत

**(३१) ५६६१ (२६-०४-२०२५). श्री.अमोल जावळे (रावेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोठे वाघोदे व परिसर (ता.रावेर जि.जळगांव) येथे विशिष्ट समाजातर्फे संदलच्या मिरवणुकीत सहभागी असलेल्या तरुणांनी प्रक्षोभक आणि सामाजिक सौहार्द बिघडवणारे बँनर फडकवल्याचे दिनांक १६ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित मिरवणुकीचे फोटो/व्हिडिओ विविध सोशल मीडिया माध्यमांवर उपलब्ध असतांना सदर प्रकरणाला १ महिन्याचा कालावधी उलटूनही तसेच सावदा (ता.रावेर) पोलिस स्टेशन येथे गावातील नागरिकांमार्फत तक्रार दाखल करुन सदर प्रकरणाला १ महिन्याचा कालावधी उलटूनही आयोजक व आरोपींना अटक करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वाकरण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०९-२०२५) :** (१) होय,

दिनांक १६/०१/२०२५ रोजी सायंकाळी १८.०० ते १९.०० वाजेच्या दरम्यान वाघोदा बुद्रुक, ता. रावेर गावातील आरोपींनी, मुस्लीम समुदायाने काढलेल्या संदल मिरवणुक सुरु असताना शेवटच्या मंडळातील मुलांनी ओवेसी यांच्या भाषणाच्या वक्तव्यातील “१५ मिनिट” असे आक्षेपार्ह फलक व औरंगजेब छायाचित्र फलक हातात धरुन चिथावणी देवून फिर्यादीचे व हिंदू धर्मियांचे धार्मिक भावना दुखावल्या गेल्या म्हणून सावदा पो.स्टे. गु.र.नं. १६/२०२५, भा.न्या.सं. कलम २९९, ३(५) प्रमाणे दिनांक २०/०१/२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

(२) नमूद गुन्ह्यामध्ये ७ वर्षापेक्षा कमी शिक्षा असल्याने शासनाच्या नियमानुसार व मा. सर्वोच्च न्यायालयाचे अर्नेषकुमार विरुद्ध बिहार राज्य या न्यायनिवाड्याप्रमाणे सदर अपराधात निष्पन्न झालेल्या १० आरोपीतांना B.N.S.S. ३५

(३) प्रमाणे दिनांक ३०/०१/२०२५ रोजी नोटीसा देण्यात आलेल्या आहेत. सदरचा गुन्हा हा पोलीस तपासावर प्रलंबित आहे.

---

## मुंबईतील गोरेगावमधील सिध्दार्थ नगर पत्राचाळ पुनर्विकासाबाबत

**(३२) ५६९८ (०१-०५-२०२५). डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील

गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील गोरेगावमधील सिध्दार्थ नगर म्हणजेच पत्राचाळ पुनर्विकासांतर्गत म्हाडाच्या मुंबई मंडळाला मिळालेल्या ९ भूखंडावर गृहनिर्मिती करण्याचा निर्णय मंडळाने घेतला असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, मंडळाने सर्वसामान्यांसाठी पत्राचाळीत आणखी १,४५६ घरे बांधण्याचा निर्णय घेतला असून आर-७/ए १, आणि आर- १२ ए या दोन भूखंडावर गृहनिर्मितीसाठीचा प्रस्ताव मंडळाने प्रशासकीय मान्यतेसाठी म्हाडाकडे पाठवून त्यानंतर पुढील मान्यतेसाठी राज्य सरकारकडे पाठविण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन घरे लवकरात लवकर बांधून सर्वसामान्यांसाठी उपलब्ध करू देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-०१-२०२६) :** (१) व (२) पत्राचाळ पुनर्विकास प्रकल्पाअंतर्गत मुंबई मंडळास भूखंड क्र. आर-१, आर-३, आर-४ व आर-५ तसेच, आर-७/ए-१, आर-७/ए-२, आर-१०, आर १२/ए व आर-१३ असे एकूण ९ भूखंड प्राप्त झाले आहेत. या भूखंडापैकी आर-१, आर-४, आर-७/ए-२ व आर-१३ या चार भूखंडावर गृहनिर्माण योजना राबविण्याकरीता निविदा प्रक्रीया राबविण्यात आली असून दिनांक १४.१०.२०२५ व दिनांक १५.१०.२०२५ रोजी कार्यादेश देण्यात आलेले आहेत.

तसेच आर-७/ ए-१, आर-१२/ए या दोन भूखंडांवर गृहनिर्माण योजना राबविण्याकरीता प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव सादर करण्यात आला असून सदर योजनेत अनुक्रमे ११८१ व २३७ अशी एकूण १४१८ घरे बांधण्याचे प्रस्तावित आहे.

(३) शासन मान्यता प्राप्त झाल्यानंतर त्वरीत निविदा प्रक्रिया राबवून लवकरात लवकर सर्व सामान्यांसाठी घरे बांधून उपलब्ध करून देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(४) लागू नाही.

---

## पालघर जिल्ह्यातील जव्हार व विक्रमगड येथे सहाय्यक निबंधक सहकारी संस्था कार्यालय सुरु करण्याबाबत

**(३३) ५७६३ (०५-०५-२०२५). श्री.हरिश्चंद्र भोये (विक्रमगड) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील जव्हार व विक्रमगड येथे सहाय्यक निबंधक सहकारी संस्था कार्यालय सुरु करण्यात यावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ७ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास मा.सहकार मंत्री यांचेकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील (११-१२-२०२५) :** (१) होय, मा मंत्री (सहकार) व मा. मुख्यमंत्री यांना दिनांक ०७/०१/२०२५ अन्वये लेखी निवेदन दिले आहे.

(२) स्थानिक लोकप्रतिनिधी श्री.हरिश्चंद्र भोये वि.स.स. यांच्या दिनांक ०७/०१/२०२५ च्या मंत्री (सहकार) यांना दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने सहकार आयुक्त, म.रा., पुणे यांचेकडून सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, विक्रमगड हे कार्यालय जव्हार येथे हलविण्याबाबत अहवाल मागविण्यात आला होता.

तथापि दिनांक २०/०३/२०२५ रोजीच्या पत्रान्वये मा. श्री.हरिश्चंद्र भोये वि.स.स. यांनी सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, विक्रमगड येथील कार्यालय व सहाय्यक निबंधक चे पद कोणत्याही परिस्थितीत स्थलांतरीत करण्यात येऊ नये असे सहकार आयुक्त, म.रा., पुणे यांना कळवून त्याची प्रत मा.मुख्यमंत्री महोदयांना दिली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अल्पसंख्यांक आयुक्तालय व MARTI साठी मंजूर पदाबाबत

**(३४) ५७७७ (०५-०५-२०२५). श्रीमती सना मलिक (अणुशक्ती नगर), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अल्पसंख्यांक आयुक्तालयासाठी ३६आयुक्त पदे मंजूर झाली आहेत व जिल्हास्तरीय वर ८६ पदे मंजूर झालेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अल्पसंख्याक संशोधन व प्रशिक्षण संस्था (MARTI) साठी ११ कर्मचारी मंजूर झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वक्फबोर्ड चे मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) हे भारतीय प्रशासकीय सेवा (IAS) दर्जाचे असावेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नियोजन विभागाअंतर्गत हाय पावर कमिटी कडे पदांच्या विषयाबाबत प्रकरण प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अजित पवार (१८-११-२०२५) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

अल्पसंख्यांक आयुक्तालयासाठी ३६ पदे मंजूर असून जिल्हास्तरीय अल्पसंख्यांक कक्षासाठी ८५ पदे मंजूर करण्यात आली आहेत.

तसेच अल्पसंख्याक संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या कार्यालयासाठी ११ पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

(३) हे खरे नाही.

(४) अल्पसंख्याक संशोधन व प्रशिक्षण संस्थेकरिता मंजूर ११ पदांचा प्रस्ताव उच्च स्तरीय समितीच्या मान्यतेस्तव प्रलंबित आहे.

(५) अल्पसंख्याक आयुक्तालयातील पदांचे सेवाप्रवेश नियम तयार करण्याची, आयुक्तालयातील पदे प्रतिनियुक्तीने भरण्यासाठी पाठपुरावा करण्याची तसेच तोवर आयुक्तालयातील पदे कंत्राटी तत्वावर बाह्यस्त्रोतातून भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच अल्पसंख्याक संशोधन व प्रशिक्षण संस्थे (MARTI) वरील ११ मंजूर पदांना उच्चस्तरीय सचिव समितीची मान्यता घेण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

---

## राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत ( एनएचएम) राज्यातील डाटा एन्ट्री ऑपरेटर यांच्या नियुक्तीबाबत

**(३५) ५८१८ (३०-०४-२०२५). श्री.निलेश राणे (कुडाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत (एनएचएम) राज्यातील ३२०३ व सिंधुदुर्ग जिल्हयातील ६७ डाटा एन्ट्री

ऑपरेटर नियुक्तीच्या प्रतिक्षेत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आरोग्य विभागातील सर्व संगणक ऑपरेटर हे मे.यशस्वी अकॅडमी फॉर स्किल, पुणे या बाहय यंत्रणेमार्फत गेल्या तीन वर्षांपासून शासनाच्या विविध आरोग्य संस्थेमध्ये प्रशिक्षणार्थी असून त्यांचा शासनाच्या धोरणानुसार तीन वर्षांचा कालावधी पूर्ण झालेला असतांनाही त्यांना कार्यमुक्त करण्यात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, राष्ट्रीय आरोग्य अभियान आराखडयात मंजूर पदे वेतनाचा निधी राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत प्रती संगणक ऑपरेटर यांना रु. १५,५०० /- मंजूर असतांनाही कंपनीमार्फत फक्त रु ९,०००/- देण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत सन २०२०-२१ मध्ये ३२०३ पदे मंजूर असल्याने केंद्र शासनाच्या धोरणाप्रमाणे राज्य शासनाने उक्त प्रशिक्षणार्थी डाटा एन्ट्री ऑपरेटर म्हणून नियुक्ती देण्यास विलंब लागण्याची कारणे काय आहेत,
(५) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुसार, राष्ट्रीय आरोग्य अभियानांअंतर्गत डाटा एन्ट्री ऑपरेटर यांना नियुक्ती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर (०४-१२-२०२५) :** (१) राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत केंद्र शासनाच्या मंजूर प्रकल्प अंमलबजाणी आराखड्यामध्ये डेटा एन्ट्री ऑपरेटर बाह्यस्त्रोत यंत्रणेमार्फत नियुक्तीसाठी निधी मंजूर करण्यात येतो. यानुषंगाने सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात Third party Aggregator ॲप्रेन्टिस ॲक्ट १९६१ अंतर्गत मे.यशस्वी ॲकॅडमी फॉर स्कील, पुणे संस्थेची निवड करण्यात आली असून दिनांक ३१.०५.२०२१ रोजीच्या आदेशान्वये ३२०३ डेटा एंट्री ऑपरेटर शिकाऊ उमेदवार म्हणून नियुक्त करण्याचे आदेश देण्यात आले होते. तसेच मे.यशस्वी ॲकॅडमी फॉर स्कील, पुणे व राज्य आरोग्य सोसायटी, मुंबई यांचे सोबतचा सामंजस्य करार तीन वर्ष पूर्ण झाल्याने दिनांक२८ जुलै, २०२४ रोजी संपुष्टात आला आहे. दिनांक २८.११.२०२४ रोजीच्या आदेशान्वये नव्याने संस्था निवडीची प्रक्रीया पुर्ण होईपर्यंत मे.यशस्वी ॲकॅडमी फॉर स्कील, पुणे यांना मुदतवाढ देण्यात आली आहे.

सिंधुदूर्ग जिल्हयाकरिता सद्यस्थितीत २५ शिकाऊ उमेदवारांना दिनांक ३१ जुलै, २०२५ पर्यंत मे.यशस्वी ॲकॅडमी फॉर स्कील, पुणे यांनी मुदतवाढ दिलेली आहे. उर्वरित ४२ पदे रिक्त आहेत.
(२) राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई व मे.यशस्वी ॲकॅडमी फॉर स्कील, पुणे यांचेमध्ये झालेला करार ३ वर्षाचा होता. ॲप्रन्टिस/ शिकाऊ उमेदवार अधिनियम १९६१ अन्वये कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालय (भारत) यांचे दिनांक २५ सप्टेंबर, २०१९ रोजीच्या राजपत्रातील अधिसुचनेमधील नियम ७ A मधील उप-नियम ३ मध्ये “कोणत्याही शिकाऊ प्रशिक्षणाचा कालावधी किमान सहा महिने ते कमाल तीन वर्षाचा असेल असे नमूद केले आहे”. तसेच शिकाऊ उमेदवाराचा करार/प्रशिक्षण कालावधी संपुष्टात आल्यानंतर सदर प्रशिक्षणार्थींना कार्यमुक्त करण्यात येते.
(३) राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कार्यरत डाटा एन्ट्री ऑपरेटर/कार्यक्रम सहाय्यक या कंत्राटी पदाकरिता दरमहा रु १८०००/- मानधन मंजुर करण्यात आलेले आहे. मात्र सदर उमेदवार हे शिकाऊ उमेदवार आहेत. शिकाऊ उमेदवारांना रु.९०००/- प्रति माह विद्यावेतन देणे अपेक्षित आहे व कंपनी मार्फत शिकाऊ उमेदवारांना रु. ९०००/- प्रतिमाह विदयावेतन देण्यात येते.
(४) वर्ष २०२०-२१ कोवीड काळ असल्याने सदरील निविदा प्रक्रिया ३१ मे, २०२१ मध्ये पुर्ण करण्यात आली होती. तसेच, मे.यशस्वी अकॅडमी फॉर स्कील, पुणे या बाहयस्त्रोत यंत्रणे सोबत सामंजस्य करार दिनांक

२९.०७.२०२१ रोजी करण्यात आला होता. तदनंतर मे.यशस्वी अकॅडमी फॉर स्कील, पुणे यांचेकडून अँप्रेन्टिस / शिकाऊ उमेदवार अधिनियम १९६१ नुसार डाटा एन्ट्री ऑपरेटर (शिकाऊ उमेदवार) म्हणून नियुक्तीस सुरुवात करण्यात आलेली होती. सदर नियुक्ती देण्यास विलंब झालेला नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्याकडून धन्वंतरी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांवर झालेल्या अन्यायाबाबत

**(३६) ५८३८ (२८-०४-२०२५). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक येथील धन्वंतरी होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज येथे सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात प्रवेश घेऊन प्रशिक्षण घेणारे विद्यार्थी सन २०२१-२२ या वर्षात उत्तीर्ण झाले असून त्या विद्यार्थ्यांना बी. एच. एम. एस. उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र दोन आठवड्याच्या कालावधीत देण्याचे आदेश मुंबई मा.उच्च न्यायालयाने याचिका क्रमांक ११७९२ /२०१७ याद्वारे दिनांक ९ मे, २०२४ रोजी देण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मा. उच्च न्यायालयाने आदेश दिल्यानंतर देखील विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या प्रमाणपत्रात सर्वोच्च न्यायालयाच्या केसचा उल्लेख करून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबई मा. उच्च न्यायालयाकडून स्पष्ट आदेश असताना महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्याकडून प्रमाणपत्रावर केस चा उल्लेख करण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, त्यानुसार मुंबई मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन करून जाणीवपूर्वक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाकडून केलेल्या सदर कार्यवाहीबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (१४-०७-२०२५) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

धन्वंतरी होमिओपॅथिक महाविद्यालय, नाशिक या महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये बीएचएमएस अभ्यासक्रमाचे प्रवेश करणेकरिता केंद्र शासनाने केलेल्या निरीक्षणादरम्यान त्रुटी आढळून आल्यामुळे महाविद्यालयाची विद्यार्थी प्रवेश मान्यता नाकारण्यात आली होती. त्यानुषंगाने महाविद्यालयाने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र. ११७९२/२०१७ दाखल केली होती. तद्नंतर महाविद्यालयाने शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये बीएचएमएस अभ्यासक्रमासाठी प्रवेशित पात्र विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र देणेबाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेल्या रिट याचिका क्र. ११७९२/२०१७ मधील अंतरिम अर्ज क्र. ३८३८/२०२१ मध्ये मा. न्यायालयाने दिनांक ०९.०५.२०२४ रोजी आदेश पारित केले आहे. सदर आदेशानुसार, दोन आठवडयात संबंधित पात्र विद्यार्थ्यांना विद्यापीठातर्फे पदवी प्रमाणपत्र देणेबाबत मा. न्यायालयाने निर्देश दिले आहेत. मा. न्यायालयाच्या उक्त निर्णयास अनुसरुन विद्यापीठामार्फ़त पात्र विद्यार्थ्यांना "Degree Certificate issued as per Hon'ble Bombay High Court order dated ०९/०५/२०२४ in A.N०.३८३८/ २०२१ In W.P.N०.११७९२ /२०१७ subject to Outcome of W.P.N०.११७९२/ २०१४" अशा शेऱ्याचा उल्लेख करुन पदवी प्रमाणपत्र निर्गमित करण्यात आलेले आहे.

(३) व (४) धन्वंतरी होमिओपॅथिक महाविद्यालय, नाशिक या महाविद्यालयाच्या विद्यार्थी प्रवेशाच्या अनुषंगाने रिट याचिका क्र. ११७९२/२०१७ मध्ये अद्यापी अंतिम निर्णय झाला नसल्यामुळे विद्यार्थ्यांच्या पदवी प्रमाणपत्रावर सदर याचिका प्रलंबित असल्याचा उल्लेख करण्यात आलेला आहे. ज्या महाविद्यालयांच्या मान्यतेबाबतचे प्रकरण मा. न्यायालयासमोर अंतिम निर्णयास्तव प्रलंबित असते, त्यामध्ये पदवी प्रमाणपत्र देण्याबाबत अंतरिम निर्णय झाल्यास, विद्यापीठाच्या पध्दतीनुसार न्यायालयीन प्रकरणाचा शेरा नोंदवून पदवी प्रमाणपत्र निर्गमित करण्यात येत असते. तथापि, अशा न्यायालयीन प्रकरणात मा. न्यायालयाचा निर्णय महाविद्यालयाच्या बाजूने झाल्यास, शेरा नसलेले पदवी प्रमाणपत्र नव्याने निर्गमित करण्यात येते.सबब धन्वंतरी होमिओपॅथिक महाविद्यालय, नाशिक या महाविद्यालयाच्या मान्यतेच्या अनुषंगाने मा. न्यायालयाच्या निर्णय महाविद्यालयाच्या बाजूने झाल्यास, संबंधित विद्यार्थ्यांना शेरा असलेले पदवी प्रमाणपत्र बदलून देण्यात येईल.

(५) व (६) सदर प्रकरणी मा. न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन झालेले नाही. तसेच, शेरा असलेले पदवी प्रमाणपत्र निर्गमित केल्यामुळे विद्यार्थ्यांचे कुठल्याही प्रकारचे शैक्षणिक नुकसान होत नाही अथवा झालेले नाही.

---

**शासनाने लहान मुलांच्या शाळा सकाळी ९ नंतर सुरू करणेबाबत**

**(३७) ५८६१ (०५-०५-२०२५). श्री.प्रदिप जैस्वाल (छत्रपती संभाजीनगर मध्य) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने लहान मुलांच्या शाळा सकाळी ९ नंतर सुरू कराव्यात असा शासनाने आदेश काढला असतांनाही छत्रपती संभाजीनगर जिल्हयातील बहुतांश शाळा ऐन थंडीत सकाळी सात वाजता भरत असल्याचे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या आदेशाचे पालन न करणाऱ्या शाळा व्यवस्थापकांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (२१-०१-२०२६) :** (१) हे खरे नाही.

आधुनिक युगातील बदललेली जीवनशैली पाहता, विद्यार्थी रात्री उशिराने झोपतात व सकाळी शाळा लवकर असल्याने त्यांची झोप पूर्ण होत नाही व त्याचा नकारात्मक परिणाम विद्यार्थ्यांच्या शारीरिक व मानसिक आरोग्यावर होताना दिसत असल्यामुळे राज्यातील सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनांच्या ज्या शाळांची पूर्व प्राथमिक ते इयत्ता ४ थी पर्यंतचे वर्ग भरण्याची वेळ सकाळी ९ वाजता अगोदरची आहे, त्या शाळांनी शैक्षणिक वर्ष सन २०२४-२५ पासून पूर्व प्राथमिक ते इयत्ता ४ थी पर्यंतचे वर्ग भरवण्याची वेळ सकाळी ९ किंवा ९ नंतर ठेवावी अशा सूचना शासनाच्या दिनांक ८ फेब्रुवारी, २०२४ रोजीच्या शासन परिपत्रकांवर निर्गमित करण्यात आल्या आहेत.

त्या अनुषंगाने शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी अधिनस्त सर्व शिक्षण उपसंचालकांना तसेच सदर शिक्षण उपसंचालकांच्या कार्यक्षेत्रातील सर्व शिक्षणाधिकाऱ्यांना शासन परिपत्रक, दिनांक ८ फेब्रुवारी, २०२४ मधील सूचनांचे काटेकोर पालन करण्याची निर्देश दिले आहेत.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर यांनी दिनांक ८ फेब्रुवारी, २०२४ रोजीच्या शासन पत्रकातील सूचनांचे पालन करून, जिल्ह्यातील सर्व व्यवस्थापनाच्या व सर्व माध्यमांच्या शाळांमधील पूर्व प्राथमिक ते इयत्ता ४ थी पर्यंतचे वर्ग सकाळी ९ किंवा ९ नंतर भरविण्याबाबत शिक्षणाधिकारी,

महानगरपालिका व सर्व गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती यांना दिनांक ०५ डिसेंबर, २०२४ च्या पत्रांन्वये निर्देश दिले आहेत. तसेच या सूचनांचे पालन होत असल्याची खात्री करून शहरातील शाळेच्या वेळा बदलताना गर्दी टाळण्याचे दृष्टीने शासकीय व निमशासकीय कार्यालयाच्या वेळी समांतर येणार नाहीत याची दक्षता घेण्याबाबत देखील संबंधितांना शिक्षणाधिकारी (प्राथमिक), छत्रपती संभाजीनगर यांच्याकडून सूचना देण्यात आलेल्या आहेत. याबाबत शिक्षणाधिकारी (प्राथमिक), छत्रपती संभाजीनगर यांच्याकडून बैठकीच्या माध्यमातून आढावा घेण्यात आला असता, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील प्राथमिक शाळा या सकाळच्या सत्रात भरविण्यात येत नसल्याचे आढळून आले आहे.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पारोळा (जि. जळगाव) नगरपरिषद कार्यालयातील गट ब व क प्रवर्गातील कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(३८) ५८९७ (२३-०४-२०२५). श्री.अमोल पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पारोळा (जि. जळगाव) येथील पारोळा नगरपरिषदेची वाढती लोकसंख्या पाहता नगरपरिषद कार्यालयात पुरेशे कर्मचारी नसल्याने प्रशासकीय दैनंदिन कामकाजात मोठ्या प्रमाणात अडचणी निर्माण होत असल्याने या नगरपरिषदेतील रिक्त असलेली गट ब व गट क संवर्गातील पदे लवकरात लवकर भरण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींकडून मा.नगरविकास मंत्री यांच्याकडे केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येथील महाराष्ट्र नगरपरिषद अभियांत्रिकी तसेच कर व प्रशासकीय, अग्निशमन, स्वच्छता निरीक्षक इत्यादी विभागातील गट ब व क प्रवर्गातील एकूण १७ मंजूर पदांपैकी १० पदे रिक्त असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रिक्त पदे लवकरात लवकर भरुन नगरपरिषदेच्या विविध विभागातील कामे विनाविलंब सुरळीत पार पडावीत यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-१२-२०२५) :** (१) हे खरे आहे,
पारोळा नगरपरिषदेतील संवर्ग कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे दिनांक ११ फेब्रुवारी, २०२५ रोजीचे निवेदन नगरपरिषद प्रशासन संचालनालयास प्राप्त झाले आहे.
(२) अंशतः खरे आहे,
पारोळा नगरपरिषदेकरीता महाराष्ट्र राज्यस्तरीय नगरपरिषद सेवा (गट-क) संवर्गातील एकूण १७ मंजूर पदांपैकी ९ पदे भरलेली असून, ८ पदे रिक्त आहेत.
(३) महाराष्ट्र राज्य स्तरीय नगरपरिषद स्वच्छता निरिक्षक सेवा श्रेणी-क संवर्गातील समावेशनाअंतर्गत माहे ऑगस्ट, २०२४ मध्ये १ कर्मचारी उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.
महाराष्ट्र नगरपरिषद संवर्ग पदभरती २०२३ अंतर्गत पारोळा नगरपरिषदेकरीता माहे ऑक्टोबर, २०२४ मध्ये महाराष्ट्र नगरपरिषद पाणी पुरवठा अभियांत्रिकी सेवा श्रेणी-क चे १ आणि माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये कर निर्धारण व प्रशासकीय सेवा श्रेणी-क चे २ अधिकारी/कर्मचारी उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वैद्यकीय पदव्युत्तर पदवी अतिविशेषोपचार तज्ञ सुपर स्पेशालिटी**

**यांच्या जागा रिक्त असल्याबाबत**

**(३९) ६०६९ (२८-०४-२०२५). श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एम.बी.बी.एस. ही वैद्यकीय पदवी मिळाल्यानंतर पुढे एम.डी., एम. एस. पदव्युत्तर शिक्षक पदवी हा अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या डॉक्टर हे विशेषतज्ञ स्पेशलिटी डॉक्टर असून यानंतर हे डॉक्टर अतिविशेषोपचार तज्ञ (सुपर स्पेशलिटी) अभ्यासक्रमासाठी प्रवेशास पात्र असतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अभ्यासक्रमासाठी देशात दरवर्षी ५००० जागा उपलब्ध असून यात पात्र असणाऱ्यांची संख्या ही मूळ जागांच्या संख्येच्या दहा पट असून सुध्दा २० टक्के जागा रिक्त असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार सदर जागा रिक्त राहण्याची कारणे काय आहेत तसेच या रिक्त जागा भरण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०४-०७-२०२५) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

NEET-SS-२०२४ ही परीक्षा National Board of Examinations in Medical Sciences, नवी दिल्ली यांचेकडून घेण्यात येत असते आणि सदर अभ्यासक्रमाचे प्रवेश प्रक्रिया Medical Counselling Committee (MCC) यांचेकडून राबविण्यात येते. राज्यात शै.व. २०२३-२४ मध्ये अतिविशेषोपचार तज्ञ (सुपर स्पेशलिटी) अभ्यासक्रमाच्या ७७ मंजूर जागांपैकी ६७ जागांवर प्रवेश झालेले असून केवळ १० जागा रिक्त राहिलेल्या आहेत.

केंद्र शासनाद्वारे शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील अतिविशेषोपचार तज्ञ (सुपर स्पेशलिटी) प्रवेश प्रक्रियेकरीता प्रवेश परीक्षा दिनांक २९/०३/२०२५ व दिनांक ३०/०३/२०२५ रोजी घेण्यात आलेली असून सदर परिक्षेचा निकाल दिनांक २५/०४/२०२५ या दिनांकास जाहीर झालेला आहे. सदर परीक्षेच्या अनुषंगाने पात्र उमेदवारांची प्रथम व द्वितीय निवड यादी प्रसिध्द करण्यात आलेली असून तृतीय निवड यादीबाबतचे वेळापत्रक अद्याप केंद्र शासनामार्फत प्रसिध्द करण्यात आलेले नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) व (५) कोविड-१९ महामारीमुळे शैक्षणिक वर्ष सन २०२१ च्या एमडी, एमएस आणि डीएनबी अभ्यासक्रमांच्या प्रवेशांना उशीर झाला होता. या उशीरामुळे सदर अभ्यासक्रम पूर्ण होण्याची तारीख जानेवारी २०२५ पर्यंत पुढे गेली. राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने या विद्यार्थ्यांसाठी NEET- SS-२०२४ परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला, जेणेकरुन ते परीक्षा देण्यासाठी पात्र ठरतील. मा. सर्वोच्च न्यायालयाने परिक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय मान्य केला आहे.

---

**पुण्यातील चाकण शिक्रापुर राष्ट्रीय महामार्गाचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(४०) ६३१५ (३०-०४-२०२५). श्री.बाबाजी काळे (खेड आळंदी), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यातील चाकण शिक्रापुर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ डी चे काम प्रलंबित असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास उक्त महामार्गाचे काम राज्य शासनामार्फत करण्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ११ जानेवारी, २०२५ रोजी मा.मंत्री रस्ते महामार्ग, भारत सरकार यांचेकेडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू महामार्ग डी पी आर सह किती कालावधीत पूर्ण होणे अपेक्षित आहे त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (१२-०९-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) दिनांक २१.०५.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये तळेगाव चाकण शिक्रारपूर या रस्त्याच्या सुधारणा करणे या प्रकल्पास मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

सदर मंजूर कामाची निविदा दिनांक ०३.०७.२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आली असून, निविदा प्रक्रिया पूर्ण करुन काम लवकरच हाती घेण्याचे नियोजन राहील.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुण्यातील चाकण व औदयोगिक क्षेत्रामध्ये १९ गावाकरिता पाणी पुरवठा योजना ही चाकण इंडस्ट्री व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या माध्यमातून केल्याबाबत

**(४१) ६३२१ (०५-०५-२०२५). श्री.बाबाजी काळे (खेड आळंदी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुण्यातील चाकण व औदयोगिक क्षेत्रामध्ये १९ गावाकरिता पाणी पुरवठा योजना ही चाकण इंडस्ट्री व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या माध्यमातून केली जात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चाकण इंडस्ट्री ही सामाजिक संस्था असून सदर संस्था उदयोजकांना नळ जोडणी देण्याचे काम पाहत असून संस्थेबाबत अनेक तक्रारी प्राप्त होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त योजनांचे संकलन व देखभाल दुरुस्तीचे काम संपूर्णत: कार्यकारी अभियंता, एमजीपी पुणे यांनी कार्यकारी अभियंता एमआयडीसी चिंचवड पुणे यांचे नियंत्रणखाली उक्त योजना देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (११-१२-२०२५) :** (१) होय हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

चाकण इंडस्ट्रिज असोसिएशन ही संस्था महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या (MIDC) क्षेत्राबाहेरील परिसरातील औद्योगिक संस्थांकरीता अत्यावश्यक सुविधा पुरविण्यासाठी स्थापन केलेली आहे. चाकण इंडस्ट्रिज असोसिएशन अंतर्गत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या (MIDC) क्षेत्राबाहेरील परिसरातील औद्योगिक ग्राहकांना चाकण पाणी पुरवठा योजनेतून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत पाणी पुरवठा करणेत येत असून त्यांची पाणीपट्टी वसूली चाकण इंडस्ट्रिज असोसिएशन कडून करण्यात येऊन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे भरणा करण्यात येते.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

चाकण औद्योगिक क्षेत्र व १९ गावे पाणी पुरवठा योजना ही महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीची

योजना असून सन २०११ पासून सदर योजनेची दैनंदिन देखभाल दुरूस्ती महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करण्यात येत आहे. त्यामुळे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचे नियंत्रणाखाली सदर योजना देणेबाबत कोणताही प्रस्ताव देण्यात आलेला नसून अशी कोणतीही कार्यवाही प्रस्तावित नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या दुर्लक्षामुळे राज्यातील कंपनी अन्य राज्यात स्थलांतरित होत असलेबाबत**

**(४२) ६३४० (०५-०५-२०२५). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबड औद्योगिक वसाहतीत प्लॉट नंबर एस ३५ येथे आराखडा मंजूर (प्लान पास) न करता बेकायदेशीर बांधकाम केल्यामुळे सदर प्लॉटला लागून असणाऱ्या पेटको प्रिसिजन कंपोरेंट्स प्रायव्हेट लिमिटेड या ८०% एक्स्पोर्ट करणाऱ्या कंपनीला मालाची वाहतूक करता येत नाही तसेच सदर कंपनीत अपघात झाल्यास आगीचा बंब जाण्याचा रस्ता नसल्यामुळे कर्मचाऱ्यांच्या जीवितास धोका असल्यामुळे हा प्लांट इतर राज्यात हलविण्यासाठीचा अर्ज दिनांक ३ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास दिलेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या भूखंड वाटप समितीच्या दिनांक २ सप्टेंबर,२०२४ रोजीच्या बैठकित ३०० चौ. मीटर क्षेत्र रस्त्यासाठी देण्याचा निर्णय घेतला असूनही त्याची अंमलबजावणी न होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार भूखंड क्रमांक ३५ वरील अनाधिकृत बांधकाम करणाऱ्या व्यक्ती / संस्था तसेच याकडे दुर्लक्ष करणाऱ्या प्रादेशिक अधिकारी यांच्यावर कारवाई करणेसह सदर कंपनीला जागा वितरित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (२८-०१-२०२६) :** (१) हे खरे आहे.
(२) M/s. Prasanna Precision Pvt Ltd या भूखंडधारकास अति नाशिक औद्योगिक क्षेत्रामध्य एस-३५ क्षेत्र २३२६ चौ.मी. या भूखंडाचे वाटप करण्यात आले आहे. सदर भूखंडामधील ३०० चौ.मी. क्षेत्र रस्त्यासाठी मे. पॅटको प्रिसीजन कंपोनंट्स प्रा.लि यांना देणेबाबतचा निर्णय म.औ.वि.महामंडळाने दिनांक ०२/०९/२०२४ रोजीच्या बैठकीमध्ये घेतला आहे. तथापि एस-३५ चे भूखंडधारक M/s. Prasanna Precision Pvt Ltd यांनी दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर नाशिक यांचे न्यायालयातील दावा क्र. स्पे.मु.न.७८५/२०२४ हा दावा दाखल केलेला असून सदर दाव्यामध्ये मा. न्यायालयाने दिनांक २६/०९/२०२४ रोजी खालीलप्रमाणे आदेशीत केले आहे.

By way of ex-parte injunction, defendants are restrained from alloting or alienating disputed, Not to third party till further order.

मे. प्रसन्ना प्रिसीजन प्रा.लि यांना वाटप केलेल्या S-३५ या भूखंडामधून ३०० चौ.मी. क्षेत्र मे. पेंटको प्रिसीजन प्रा.लि यांना देणेबाबतचा निर्णय महामंडळाने दिनांक ०२/०९/२०२४ रोजीच्या LAC मध्ये घेतल्यामुळे त्यांनी मा. दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, नाशिक येथे उपरोक्त नमूद दावा दाखल केला आहे. त्यामुळे दोन्ही पक्षांच्या आपसी तडजोडनामांच्या आधारे महामंडळाने भूखंड क्र. S-३५ या भूखंडामधून मे. पॅटको प्रिसीजन प्रा.लि यांना मंजूर केलेल्या ३०० चौ.मी. क्षेत्राच्या भुखंडाच्या बदल्यात मे. प्रसन्ना प्रिसीजन प्रा.लि यांना ३०० चौ.मी. भुखंडाचे वाटप करण्यासाटी सुविधा क्षेत्र क्र. ३० मधून ३०० चौ.मी. इतके क्षेत्र दिनांक ११/०९/२०२५

रोजीच्या MMC च्या बैठकीमध्ये औद्योगिक मध्ये रुपांतरीत करण्यात आलेले असून सदर क्षेत्र मे. प्रसन्ना प्रिसिजन प्रा.लि यांना उभय पक्षांच्या आपसी तडजोडनामा नुसार वाटप करण्यासाठी मा. मु.का.अ यांची मंजूरी प्राप्त झालेली आहे. वाटप करण्याची कार्यवाही सुरु आहे. सदर ३०० चौ.मी. क्षेत्राचे वाटप केल्यानंतर आपसी तडजोडीनुसार मे. प्रसन्ना प्रिसिजन प्रा.लि हे त्यांनी दाखल केलेला न्यायालयीन दावा काढून घेणार आहेत.
(३) भुखंड क्र. S-३५ क्षेत्र २३२६ चौ.मी. या भुखंडाचे वाटप मे. प्रसन्ना प्रिसिजन प्रा.लि यांना वाटप केलेले असून प्रादेशिक कार्यालयाने त्यांचे दिनांक २९/०८/२०२३ रोजीचे पत्रानुसार सदर क्षेत्राचा ताबा देण्यात येत असल्याबाबत सदर भूखंडधारकास कळविलेले आहे. त्यामुळे भूखंडधारकाने त्यांना वाटप केलेल्या भुखंडावरच बांधकाम केलेले असल्यामुळे सदर बांधकाम केल्यामुळे भुखंडधारकावर कारवाई करण्याचा वा त्याकडे दुर्लक्ष करणारे प्रादेशिक अधिकारी यांचेवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

तसेच उभय पक्षांच्या आपसी तडजोडीनुसार मे. प्रसन्ना प्रिसिजन प्रा.लि यांना सुविधा क्षेत्र क्र. ३० मधून ३०० चौ.मी इतके क्षेत्र वाटपाची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे. मे. पॅटको प्रिसीजन प्रा.लि यांना भुखंड क्र. S-३५ मधून २६३.१० चौ.मी. इतके क्षेत्र वाटपाची कार्यवाही देखील अंतिम टप्प्यात आहे. सदर क्षेत्राचं वाटप दोन्ही कंपन्यांना होत असल्यामुळे त्यामध्ये असलेला वाद संपुष्टात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जामखेडा (ता.देवळा, जि.नाशिक) येथील लायकेश्वर शिवारातील वीज पुरवठा सुरळीत सुरु करण्याबाबत

**(४३) ६३६९ (२६-०४-२०२५). डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जामखेडा (ता.देवळा, जि.नाशिक) येथील लायकेश्वर शिवारातील वीजेचा पुरवठा करण्यासाठी ३० ते ३५ वर्षांपूर्वीच्या जुन्या तारांवरच वीजेचा भार असल्याने तांत्रिक बिघाड होऊन शिवारातील ट्रान्सफार्मरवरील तारा तुटून वीज पुरवठा वारंवार खंडीत होत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिवसा वीजपुरवठा सुरु असताना वीजेच्या भारामुळे तारा गरम पडून वारंवार तुटल्याने मोठ्या प्रमाणावर वीजेचा खोलंबा होत असून त्यामुळे पिकांना पाणी देता येत नसल्याने तारा जोडणीसाठी शेतकऱ्यांना आर्थिक झळ बसत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन लायकेश्वर शिवारातील वीज तारा नव्याने जोडून वीजेचा पुरवठा सुरळीत सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०१-२०२६) :** (१) हे अंशत: खरे आहे,

लायकेश्वर शिवारातील जामखेडा ग्रुप क्र. ३ या एका रोहीत्रावर लघुदाब वाहिनीच्या पोलमधील अंतर जास्त असल्याने वाऱ्यामुळे वीज तारा एकमेकांच्या संपर्कात आल्यामुळे वीज पुरवठा खंडीत झाला होता.
(२) हे खरे नाही.
(३) सदर ठिकाणी महावितरणतर्फे देखभाल व दुरुस्तीअंतर्गत पोलमधील गाळयातील अंतर कमी करण्यासाठी नवीन ४ अतिरिक्त पोल टाकण्यात आलेले असून ०७ गाळयांच्या जीर्ण तारा बदलण्यात आलेल्या आहेत. तसेच, सदर रोहित्रांची वितरण पेटी बदलण्यात आली असून, सद्यस्थितीत वीज पुरवठा सुरळीत सूरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

**बीड जिल्ह्यातील संस्थेअंतर्गत शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या तपशीलवार माहिती मिळणेबाबत**

**(४४) ६३८४ (०५-०५-२०२५). श्री.संदिप क्षीरसागर (बीड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवगण शिक्षण संस्था राजुरी नवगण, आदर्श शिक्षण संस्था बीड, विनायक युवक कल्याण संस्था, बीड व आनंद कृषी प्रतिष्ठाण, बीड या संस्थेने त्यांच्या सर्व शाळेतील शिक्षक संवर्ग, लिपीक संवर्ग, मुख्याध्यापक, प्राध्यापक व प्राचार्य यांची निवड केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यांची निवड शासन निर्णयाप्रमाणे संच मान्यता कशाप्रकारे घेण्यात आली किंवा कसे याची तपशीलवार माहिती स्थानिक लोकप्रतिनिधी स्मरणपत्रासह पत्राद्वारे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बिंदू नामावलीनुसार संस्थेतील सर्व पात्र, अपात्र कर्मचाऱ्यांची तपशीलनिहाय माहिती तसेच दिव्यांग संवर्गातून झालेल्या कर्मचाऱ्यांची निवड, तसेच सन २०२३-२०२४, २०२४-२०२५ या कालावधीत नव्याने नियुक्ती करण्यात आलेल्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची यादी बिंदुनामावली याची नियमोचीत माहिती मागितली असून अद्याप यावर कोणतेही अनुपालन झाले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधीद्वारे मागविण्यात आलेली माहिती देण्यासाठी टाळाटाळ करत असलेल्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्योत येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (२९-०१-२०२६) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मागणी केलेली माहिती देण्यात आलेली आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगाव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील स्त्रीरोग विभागातील पदव्युत्तरच्या पहिल्या वर्षातील विद्यार्थ्यांची व्दितीय वर्षातील विद्यार्थीनींनी रॅगिंग केल्याबाबत**

**(४५) ६४८१ (०५-०५-२०२५). श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील स्त्रीरोग विभागातील पदव्युत्तरच्या पहिल्या वर्षातील सहा विद्यार्थ्यांची व्दितीय वर्षातील विद्यार्थीनींनी रॅगिंग केल्याची तक्रार दिनांक २५ सप्टेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास अँटिरॅगिंगच्या राष्ट्रीय हेल्पलाईनच्या ई-मेलवर प्राप्त झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यासाठी उपअधिष्ठाता यांच्या अध्यक्षतेखालील पंधरा सदस्यीय समिती गठीत करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त समितीने चौकशी करुन आपला अहवाल शासनास सादर केला आहे काय,

(४) असल्यास, चौकशी अहवालात काय आढळून आले, त्यानुषंगाने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (२५-०६-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगाव यांचेकडे दिनांक २५.०९.२०२४ रोजी

helpline@antiraggin.in या ईमेल वरुन तक्रार अर्ज प्राप्त झाला होता.
(२) होय, हे खरे आहे.
(३) अधिष्ठातास्तरावर नेमण्यात आलेल्या ॲन्टी रॅगींग समितीच्या अहवालाशी तक्रारदार विद्यार्थी असमाधानी असल्यामुळे संचालनालयास्तरावर दिनांक १०.१०.२०२४ रोजीच्या पत्रान्वये चौकशी समिती गठीत करण्यात आली होती.
(४) संचालनालयास्तरावर नेमण्यात आलेल्या चौकशी समितीने सादर केलेल्या अहवालानुसार महाविद्यालयातील रॅगिंग रोखण्याच्या अनुषंगाने निवासी डॉक्टरांचे समुपदेशन करुन विभागातील वातावरण सलोख्याचे राखण्यासाठी सूचना देणेबाबत, प्राप्त तक्रारींवर आळा घालण्याच्या अनुषंगाने योग्य मार्गदर्शक तत्वे तयार करणेबाबत, विभागातील विद्यार्थ्यांशी समन्वय साधून विभागात विश्वासाचे वातावरण राहण्यासाठी प्रयत्न करणेबाबत आवश्यक उपाययोजना करण्यास संचालनालयाने

दिनांक ०९.०१.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगाव यांना कळविले आहे. संचालनालयास्तरावर नेमण्यात आलेल्या चौकशी समितीने सादर केलेल्या अहवालानुसार महाविद्यालयातील रॅगिंग रोखण्याच्या उपाययोजना दिनांक ०९.०१.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगाव यांना कळविण्यात आलेल्या आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वृत्तपत्र अथवा इलेक्ट्रॉनिक माध्यमांत प्रसिध्द होणाऱ्या सरकारी जाहिरातींसाठी सार्वजनिक निधीचा गैरवापर केला जात असल्याबाबत

**(४६) ६४८८ (०८-०४-२०२५). श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात वृत्तपत्र अथवा इलेक्ट्रॉनिक माध्यमांत प्रसिध्द होणाऱ्या सरकारी जाहिरातींसाठी सार्वजनिक निधीचा गैरवापर केला जात असल्याच्या जनहित याचिकेची मा.उच्च न्यायालयाने दखल घेत हा गैरवापर टाळण्यासाठी तीन सदस्यीय समिती स्थापन करण्याचे आदेश राज्याच्या मुख्य सचिवांना माहे ऑक्टोबर, २०२४ मध्ये दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मा.उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये शासनाने समिती गठीत केली आहे काय,
(३) असल्यास, उक्त समितीवर सदस्य म्हणून कोणाची निवड करण्यात आली आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी करुन समिती गठीत करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-११-२०२५) :** (१) मा. उच्च न्यायालयात दाखल याचिका क्र. ५१३/२०१८ च्या अनुषंगाने शासकीय जाहिरात विविध प्रकारच्या माध्यमांद्वारे प्रसिध्द करताना निर्माण होणाऱ्या तक्रारींचे वेळोवेळी निरसन करण्याकरीता तज्ञ जाणकारांची त्रिसदस्यीय समिती गठीत करण्याचे आदेश मा. उच्च न्यायालयाने दिले आहेत. या अनुषंगाने शासनाच्या दिनांक २८.११.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये समिती गठीत करण्यात आली आहे.
(२) होय.
(३) त्रिसदस्यीय समितीमध्ये खालील तज्ञांची नेमणूक करण्यात आली.
१. प्रा. दैवता दिपक पाटील, सहायक प्राध्यापक, पत्रकारीता आणि संज्ञापन विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

२. डॉ. नरेंद्र वसंतराव बोरलेपवार, व्यवस्थापकीय संचालक, स्वरा मिडीया प्रा.लि.मुंबई.
३. श्री. आशुतोष शरद पाटील, संपादक, जय महाराष्ट्र न्युज चॅनल, मुंबई.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## इन्फ्रा वीज वितरण कंपनी मार्फत बसवण्यात येणाऱ्या ट्रान्स्फार्मरच्या कामात दिरंगाई होत असल्याबाबत

**(४७) ६४९१ (२६-०४-२०२५). श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (परतूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र व राज्य शासनाने ग्रामीण भागातील शेतीपंपासाठी व गावासाठी नव्याने लागणारी एक्सप्रेस लाईन टाकून प्रत्येक गावाला गरजेनुसार १०० क्षमतेचे ट्रांसफार्मर बसवण्याची योजना अंमलात आणली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे प्रत्येक गावाला सुरळीत व मुबलक वीज पुरवठा केला जाणार असून, सदरहू काम तात्काळ पूर्ण करण्याची संपूर्ण जबाबदारी इन्फ्रा वीज वितरण कंपनीला दिली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी इन्फ्राचे अधीक्षक अभियंता कार्यकारी अभियंता किंवा उप अभियंता यांनी सदरहू काम करण्यास जाणीवपुर्वक टाळाटाळ करीत असल्यामुळे शेतकऱ्यांसाठी व गावपातळीवर सुरळीत, सुरक्षित व मुबलक वीज पुरवठा करण्याचे काम पुर्णत: प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच सदर प्रकरणी विजेचे खांब उभे करताना अंदाजपत्रकाप्रमाणे खोदकाम करणे आवश्यक असताना केवळ २ फूट खोदकाम व १ ते अर्धा फूट कॉंक्रीट करुन, अशा प्रकारे केलेल्या निष्कृष्ट दर्जाच्या कामाची देयके घेतली असल्याचे देखील निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने शेतकऱ्यांसाठी व गावपातळीवर सुरळीत, सुरक्षित व मुबलक वीज पुरवठा करण्याच्या उक्त योजनेची अंमलबजावणी करुन संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०१-२०२६) :** (१) हे अंशत: खरे आहे.
केंद्र शासनाच्या सुधारीत वितरण क्षेत्र योजना (RDSS) योजनेअंतर्गत वाहिनी विलगीकरणाच्या कामामध्ये कृषी बहुल वाहिन्याचे कृषी व अकृषी (गावठाण) वाहिन्यांमध्ये विलगीकरणाची कामे समाविष्ट आहेत. त्यामध्ये १०० केव्हीए क्षमतेचे वितरण रोहित्र उभारण्याच्या कामाचा समावेश आहे.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) हे खरे नाही.
सुधारित वितरण क्षेत्र योजना (RDSS) या योजने अंतर्गत ४५५३ वाहिनी विलगीकरणाची कामे प्रस्तावित आहेत, त्यापैकी एकूण २१४५ वाहिन्यांच्या विलगीकरणाची कामे पूर्ण झाले असून १६३१ वाहिन्यांची कामे प्रगती पथावर आहे.
तसेच वाहिनी विलगीकरणाअंतर्गत १०० केव्हीए रोहित्र उभारणीची एकूण ६७६० रोहित्रचे कामे पूर्ण झाले असून २१५६ रोहित्राचे कामे प्रगती पथावर आहेत. उपरोक्त कामे पूर्ण करण्याचा कालावधी कार्यदेश दिल्यापासून १८ ते २७ महिने इतका आहे,
(५) कामाचा वेग कमी असणाऱ्या कंत्राटदाराला कामाचा वेग वाढविण्यासाठी "नोटीस टु करेक्ट" देण्यात आली असून, त्याव्दारे प्राधान्याने कामे पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

अद्यापपर्यंत ०२ कंत्राटदारांना नोटीस टु टर्मिनेशन २४ कंत्राटदारांना नोटिस टु करेक्ट देण्यात आले आहेत.

महावितरणच्या विविध स्तरावरील अधिकाऱ्याकडून कंत्राटदाराच्या कामाची तपासणी नियमितपणे करण्यात येते व सदर तपासणीमध्ये निदर्शनास आलेल्या त्रुटींची पूर्तता / दुरुस्ती कंत्राटदाराकडून करून घेण्यात येते. तसेच मे.आरईसीपीडीसीएलची प्रकल्प व्यवस्थापन एजन्सी (Project Management Agency -PMA) म्हणून नेमणूक करण्यात आली असून सदर एजन्सी मार्फत देखील नियमितपणे कंत्राटदाराच्या केलेल्या कामाची पाहणी करण्यात येते. त्रुटीची पुर्तता केल्यानंतर सदर कंत्राटदाराच्या कामाची वीज देयके अदा करण्यात येतात.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना सुरू करण्याबाबत**

**(४८) ६५०२ (०५-०५-२०२५). श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २००५ पूर्वी अंशत अनुदन प्राप्त शिक्षक-शिक्षकेतर कर्मचा-यांना हक्कांची १९८२ ची जुनी पेन्शन योजना अदयाप मान्य न झाल्याने दिनांक ७ फेब्रुवारी, २०२५ रोजी पुणे येथे आयुक्त कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी आंदोलनाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, जुनी पेन्शन मिळणेबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (०१-१०-२०२५) :** (१) या अनुषंगाने विविध निवेदने व त्या अनुषंगाने विविध ठिकाणी आंदोलने होत आहेत.

(२) व (३) १. वित्त विभागाच्या दिनांक ३१/१०/२००५ च्या शासन निर्णयाच्या धर्तीवर शालेय शिक्षण विभागाने दिनांक २९/११/२०१० च्या शासन निर्णयान्वये मान्यता व अनुदान प्राप्त शैक्षणिक संस्थांच्या सेवेमधील दिनांक ०१ नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी परिभाषित योजनेच्या अंमलबजावणीची विस्तृत कार्यपद्धती विहित केलेली आहे.

२. सदर शासन निर्णयाविरुध्द विविध न्यायालयीन प्रकरणे मा. उच्च न्यायालय, मुंबई, नागपूर व औरंगाबाद खंडपीठ येथे दाखल झालेली होती. काही प्रकरणे मा. उच्च न्यायालयाने, भविष्य निर्वाह निधीचे खाते उघडण्याबाबत अंतरिम आदेशदेखील दिले आहेत. मा.उच्च न्यायालय, मुंबई येथील पूर्णपीठाने दिनांक ३०/०४/२०१९ रोजी या प्रकरणी मार्गदर्शनपर निर्णय दिला. मा.मुंबई उच्च न्यायालयामध्ये रिट याचिका क्र.८३८७ /२०१३ व त्यास संलग्न इतर अनेक याचिका दाखल करण्यात आल्या होत्या. सदर रिट याचिकांमध्ये मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे पुर्ण पिठाकडे (Full Bench) वर्ग करण्यात आल्या होत्या. पुर्ण पिठाने (Full Bench) सदर रिट याचिकावरती दिनांक ३०/०४/२०१९ रोजीच्या आदेशान्वये पुढीलप्रमाणे मार्गदर्शक निर्णय दिला आहे. :-

a) In the context of the right of an employee of private school or college of education to receive pensionary benefits and the corresponding liability of the Government to pay the same, only those schools and colleges of education which are receiving १००% grant-in-aid can be termed as aided imstitutions.

b) The employees who were apoointed prior to १.११.२००५ in aided recognized primary, secondary schools as well as colleges of education which were receiving less than १००% grant-in-aid as on १.११.२००५ would be governed by the DCP scheme.

c) The employes who were appointed prior to १.११.२००५ in aided primary, secondary and higher secondary schools as well as the colleges of education which were receiving less than १००% grant-in-aid as on १.११.२००५ but which became १००% aided before २९.११.२०१० would also be governed by the DCP Scheme.

३. तसेच रिट याचिका क्र. ८३८७/२०१३ व त्यास संलग्न इतर अनेक याचिकामध्ये मा.मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक २६/०८/२०१९ रोजी खालीलप्रमाणे स्पष्ट निर्णय दिला आहे.

२. The Full Bench of this Court held that employees of the schools, including colleges of education, who were working against fully aided i.e. १००% aided posts prior to ०१.११.२००५ irrespective of the nature of initial appointment would be governed by the old pension scheme and thus who joined or held १००% aided posts after ०१.११.२००५ would be entitled to the new pension scheme.

४. मा.उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर मधील दिनांक ३०/०४/२०१९ रोजीच्या आदेशा विरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात (सिव्हील) डायरी क्र. (एस) १८४०/२०२२ दाखल विशेष अनुमती याचिका विलंबाच्या कारणास्तव दिनांक ११/०२/२०२२ रोजी खारीज करण्यात आली आहे. तसेच, श्री.प्रदिप महल्ले व इतर यांनी दाखल केलेली विशेष अनुमती याचिका न्यायप्रविष्ट आहे.

मा.उच्च न्यायालयाच्या दिनांक ३०/०४/२०१९ च्या आदेशास मा.सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिलेली नाही. प्रकरण अद्याप न्यायप्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## स्वच्छ भारत मिशनचे प्रभारी संचालक यांनी निविदा प्रक्रीया व साहित्य खरेदीमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(४९) ६५२९ (०५-०५-२०२५). श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (परतूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाणीपुरवठा विभागातील स्वच्छ भारत मिशन चे प्रभारी संचालक यांनी निविदा प्रक्रिया व साहित्य खरेदी मध्ये गैरव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निविदा प्रक्रिया व साहित्य खरेदीत तीन चाकी सायकलचा ऐमपॅनलमेंटसाठी कागदपत्रांमध्ये फेरफार करुन अपात्र ठेकेदारांना पात्र करण्यात आले आहे एका नगाची किंमत दहा पट वाढवून सायकल ची संख्या दुप्पट करण्यात आली आहे, सफाई कामगारांचा कीट ची किम्मत दहा पट वाढवून निविदा प्रक्रिया अवैध व बेकायदेशीर राबविण्यात आली आहे, तसेच एकाच प्रोप्राएटरच्या पाच कंपन्यांना निविदा भरण्यास लावून ठेकादाराशी संगणमत करुन गैरव्यवहार करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पाणी पुरवठा विभागाने सहसचिव दर्जाचा अधिकाऱ्याला कार्यभार न देता दुय्यम दर्जाच्या

अधिकाऱ्याला अतिरिक्त पदभार देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यामुळे स्वच्छ भारत मिशनची कामे केवळ निविदा पुरती मर्यादीत राहून प्रत्यक्षात कामे झाली नसल्याने शासनाचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (११-०८-२०२५) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.

निविदा प्रक्रिया शासनाच्या (GEM) व महाटेंडर (MAHA Tender) पोर्टलवरुन ऑनलाईन (Online) पध्दतीने करण्यात आलेली असल्याने कागदपत्रांमध्ये फेरफार करण्याचा व अपात्र ठेकेदारांना पात्र करण्याचा प्रश्न येत नाही.

ट्रायसायकलकरीता निविदा प्रक्रिया करण्यापुर्वी जिल्ह्यांकडून कचरा वाहतुकीकरीता वाहने उपलब्ध नसलेल्या गावांची संख्या उपलब्ध करुन घेण्यात आलेली होती. तसेच सफाई कामगारांचा कीट करीता निविदा प्रक्रिया करतेवेळी प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये पर कचरा गोळा करणे, कचरा वाहतूक करणे तसेच कचऱ्याचे विलगीकरण करणे करिता प्रति ग्रामपंचायत किमान ४ कामगारांची गरज असल्याचे निश्चित करण्यात आले होते. त्याच आधारे निविदांमध्ये नगांची संख्या समाविष्ठ करण्यात आलेली होती. सबब नगांची संख्या दुप्पट करण्यात आली असल्याचे म्हणणे खरे नाही.

ट्रायसायकल व सफाई कामगारांच्या कीट करीताचे तांत्रिक विनिर्देश महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने मान्यतेने अंतीम करण्यात आले. तदनंतर, सफाई कामगारांच्या कीट करीता अंदाजित दर ठरविताना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने निश्चित केलेली दरसुचीचा (DSR) आधार घेण्यात आला. तसेच ट्रायसायकल व सफाई कामगारांचे कीटच्या नगांचे अंदाजित दर ठरविताना उद्योग, उर्जा व कामगार विभागाकडील दिनांक १.१२.२०१६ रोजीच्या शासन निर्णयातील नियम क्र. ३.१.२ चे पालन करुन तसेच राज्यस्तरीय प्रशासकीय विभाग खरेदी समितीच्या मान्यतेने अंतिम करण्यात आलेली आहे.

निविदा प्रक्रियेत पात्र कंपन्याची जीएसटी नोंदणी, कार्यालयाचा पत्ता व संचालक, इ. माहिती तपासली असता सदर कंपन्या वेगवेगळया असल्याचे स्पष्ट होते.

प्रस्तुत निविदा प्रक्रिया संपुर्णतः शासनाच्या जेम (GEM) व महाटेंडर पोर्टल वरुन करण्यात आलेल्या आहेत. निविदेमधील अटी शर्तीचा समावेश करताना केंद्र शासनाच्या General Finance Rule २०१७, Manual of Procurement of Goods व शासन निर्णय, उद्योग ऊर्जा व कामगार विभाग दिनांक १ डिसेंबर, २०१६ मधील तत्वांचे पालन करण्यात आलेले आहे. तसेच सदर निविदा प्रक्रिया ही प्रशासकीय विभाग खरेदी समिती आणि सक्षम प्राधिकारी यांच्या मान्यतेने वैध पद्धतीने पुर्ण करण्यात आलेली आहे.
(३) हे अंशत: खरे आहे.

पाणी पुरवठा व स्वच्छता विभागांतर्गतचे सहसचिव तथा अभियान संचालक (स्वभामि) हे पद बदलीमुळे रिक्त झालेले होते. त्यामुळे सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार राज्य पाणी व स्वच्छता मिशन कार्यालयातील अतिरिक्त अभियान संचालक (स्वभामि) यांच्याकडे काही कालावधीकरीता सोपविण्यात आलेला होता. तद्नंतर अतिरिक्त अभियान संचालक (स्वभामि) हे पद अभियान संचालक (स्वभामि) या पदाचा निकटतम असून ते दुय्यम दर्जाचे नाही. तद्नंतर अभियान संचालक (स्वभामि) या पदाचा अतिरिक्त कार्यभार भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आलेला आहे.
(४) हे खरे नाही.

माहे मार्च, २०२३ अखेर राज्यातील गावांपैकी केवळ १६% इतकी odf plus व १०% इतकी गावे odf plus model झालेली होती. आता माहे मार्च, २०२५ अखेर गावे ९४% इतकी odf plus व ७७% इतकी गावे odf plus model झालेली आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वसई (जि.पालघर) तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागात केंद्रप्रमुखांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(५०) ६६७० (०५-०५-२०२५). श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि. पालघर) तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागात एकूण १३ मंजूर केंद्रप्रमुख पदांपैकी १० पदे रिक्त असून, सद्यस्थितीत इतर शिक्षकांना प्रभारी कार्यभार देऊन केंद्रप्रमुखाची कामे चालविण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्रप्रमुखांची पदे रिक्त असल्यास, वसई-विरार शहरातील जिल्हा परिषदेच्या एकूण १९२ शाळांमध्ये गेल्या काही महिन्यांपासून केंद्रप्रमुख नसल्यामुळे शाळा व्यवस्थापनात अडथळा निर्माण झाल्याचे तसेच, वसई तालुक्यातील १३ मंजूर केंद्रप्रमुख पदांपैकी केवळ कामण, वालीव व बोळींज या केंद्रांमध्येच केंद्रप्रमुख कार्यरत असून उर्वरित ठिकाणी शिक्षकांना अतिरिक्त कार्यभार देण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माजी नगरसेवक व शिक्षण सभापती यांनी माननीय शिक्षणमंत्र्यांकडे प्रत्येक केंद्रासाठी स्वतंत्र केंद्रप्रमुख नियुक्त करण्याची मागणी लेखी स्वरूपात केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी केंद्रप्रमुखांची रिक्त पदे तातडीने भरण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (२०-०१-२०२६) :** (१) हे खरे नाही.

(२) आकृतीबंधानुसार १३ केंद्रप्रमुखांची पदे मंजूर असून त्यापैकी ६ पदे ही पदोन्नतीची भरण्यात आली आहेत. उर्वरित ७ केंद्रांचा अतिरिक्त कार्यभार प्रशासकीय कामकाजाच्या सोईने नियमित ६ केंद्रप्रमुखांकडे सोपविण्यात आलेला आहे.

(३) व (४) राज्यात केंद्रप्रमुखाची पदे भरण्याबाबतची कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे. याअनुषंगाने केंद्र प्रमुखांची मर्यादित स्पर्धा परीक्षेद्वारे रिक्त पदे भरण्याकरीता जाहीरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :** **जितेंद्र भोळे,**
**मुंबई.** **सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

वि.स. ३० (42)

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.